# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 11 | Marathi Monthly | Thane, 1 May 2024 to 31 May - 2024 | Pages 16 | Price : 10/-


# ‘धर्मराज्य पक्षा’चे महेश ठाकूर यांनी, मावळ लोकसभा मतदारसंघातून भरला उमेदवारी अर्ज



**पनवेल/कर्जत (प्रतिनिधी) : भारतातील पहिलावहिला पर्यावरण-स्नेही पक्ष अशी सर्वमान्य ओळख असलेला आणि कामगार-शेतकरी व कष्टकऱ्यांचा बुलंद आवाज असणाऱ्या ‘धर्मराज्य पक्षा’चे उमेदवार महेश ठाकूर यांनी, आपला उमेदवारी अर्ज बुधवार, दि. २४ एप्रिल-२०२४ रोजी, आकुर्डी येथील पुणे विकास प्राधिकरण कार्यालयात दाखल केला. यावेळी ‘धर्मराज्य पक्षा’चे संस्थापक/अध्यक्ष राजन राजे यांच्यासह, पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे, सचिव जयेंद्र जोग, सह-सचिव नरेंद्र पंडित, खजिनदार अजित सावंत, महाराष्ट्र राज्य महिला समन्वयक रेश्मा पवार, ठाणे लोकसभा महिला अध्यक्षा पौर्णिमा सातपुते, आदी पदाधिकारी आणि रिक्षा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी महेश ठाकूर यांनी, पनवेल तालुक्यातील कामोठे येथील जागृत हनुमान मंदिरात दर्शन घेतले.**

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील तीन आणि रायगड जिल्ह्यातील तीन, असे सहा विधानसभा मतदारसंघ मिळून मावळ लोकसभा मतदारसंघाची रचना असून, सह्याद्रीच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या सांस्कृतिक विविधतेच्या सौंदर्याने नटलेला आणि शहरी, निमशहरी, ग्रामीण व आदिवासी भागासहित, कामगारवर्गाचं प्राबल्य अशी वैविध्यपूर्ण रचना असलेला हा मावळ मतदारसंघ आहे. सर्वसामान्य कष्टकरीवर्गाचा प्रतिनिधी तसेच, पक्षाध्यक्ष राजन राजे यांचा अत्यंत विश्वासू सहकारी असलेला खंदा कार्यकर्ता, अशी महेश ठाकूर यांची ओळख असून, ‘धर्मराज्य पक्ष’प्रणित ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ’ या कामगार संघटनेचे महासचिव म्हणून, महेश ठाकूर यांनी, गेल्या दहा ते बारा वर्षांच्या कालावधीत ठाणे जिल्हा, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील अनेक कंपन्यांमधील कामगारांसाठी, लोकशाही व सनदशीरमार्गाने संघर्ष करीत, त्यांना न्याय्य मिळवून दिलेला आहे. स्थानिक धनदांडगे राजकारणी व भांडवलदारी प्रवृत्तीच्या मालकशाही आणि मुजोर व्यवस्थापनाला वेळप्रसंगी अंगावर घेत, **महेश ठाकूर यांनी, प्रस्थापित व्यवस्थेविरोधात नेहेमीच कायदेशीर लढा दिलेला आहे. पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली, कामगार संघटनेच्या माध्यमातून कार्यरत असताना, कामगारांची कंत्राटीकरणाच्या गुलामगिरीतून मुक्तता करुन, ‘कायम कामगार’ म्हणून सन्मानाचे जगणे आणि सहा** ...पृष्ठ क्र. २ वर



‘इंडिया आघाडी’च्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार श्री. राजन विचारे यांच्या निवडणुक प्रचारार्थ, दि. २५ एप्रिल-२०२४ रोजी, ठाणे शहरातील कोलबाड परिसरात, स्थानिक नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी, ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख श्री. केदार दिघे आणि महविकास आघाडीचे मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## देशाच्या लोकशाहीचा ‘DNA’ सुरक्षित राखण्याकामी... ‘NDA’ला का गाडायचं आणि ‘इंडिया-आघाडी’ला का निवडायचं...याचं बिनतोड-सडेतोड दिग्दर्शन, ‘‘इंडिया एक आयडिया’’ या शीर्षकाखाली, एक खास जनजागरण-लेखमालिका ...पृष्ठ क्र. ६ वर

**...सादरकर्ते-राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**


अंतरंग




‘कच्चाथिवू का कच्चाचिठ्ठा’ सिर्फ खुला ही नहीं...
...राजन राजे
पृष्ठ क्र. ४




उत्तरेत हाफ आणि दक्षिणेत साफ
...राजन राजे
पृष्ठ क्र. ९

वॉशिंग मशीन शब्द घराघरात पोहोचला, तेवढा हेयर कटिंग सलून नाही पोहोचला... तो पोहोचवला पाहिजे! ....संजीव चांदोरकर




जाहीरनामा पर्यावरणाचा; नव्हे, अस्तित्वाचा!
- संजय पवार
पृष्ठ क्र. १०

## ...महेश ठाकूर यांनी, मावळ लोकसभा मतदारसंघातून भरला उमेदवारी अर्ज ...पृष्ठ क्र. १ वरुन

**आकडी विक्रमी पगारासोबतच लाखाच्या घरात दिवाळी बोनस प्रदान करीत, कामगारांचे जीवनमान उंचावताना, त्यांचे आर्थिक उन्नयन घडवून आणण्याची क्रांती 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या माध्यमातून, महेश ठाकूर यांनी केली आहे.** याच अनुषंगाने, कामगारांसाठी लढत असतानाच, राजकीय-सामाजिकक्षेत्रात अग्रभागी राहून, प्रशासनासोबतदेखील त्यांनी दोन हात केलेले आहेत. सर्वसामान्य करदात्या-कष्टकरी जनतेला मुलभूत सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी, महापालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे, पनवेल तालुक्यातील उलवे येथे उभारण्यात येणाऱ्या व्यंकटेश्वर मंदिराच्या माध्यमातून, वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण भागातील स्थानिक गोरगरीब जनतेसाठी मोफत आरोग्य केंद्र उभारण्याची आग्रही मागणी, विकासकामांच्या नावाखाली ठाणे महानगरपालिकेने केलेली कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी आणि त्यामाध्यमातून भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व ठेकेदारांच्या अभद्र 'महायुती'ने केलेला भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणणे, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच महाराष्ट्र पोलिसांनादेखील दिवाळी बोनस देण्यात यावा आणि त्यांची ड्युटी आठ तासांची करण्यात यावी यासाठी जनआंदोलनाची हाक देऊन, शासनदरबारी पत्रव्यवहार करणे, निसर्ग-पर्यावरणाचा ऱ्हास ठरणाऱ्या बेसुमार वृक्षतोडीविरुद्ध प्रखर निदर्शने करणे, शिक्षण-आरोग्य-स्वच्छता या मुलभूत हक्कांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करणे, यासाठी महेश ठाकूर नेहेमीच अग्रभागी राहिलेले आहेत.

दरम्यान, मावळ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीच्या माध्यमातून, औद्योगिक क्षेत्रातील कंपनी/कारखान्यांमध्ये स्थानिक तरुणांना रोजगाराच्या दृष्टीने प्राधान्यक्रम मिळावा आणि त्यासाठीची शैक्षणिक अर्हता प्राप्त व्हावी यासाठी, स्थानिक तरुणांसाठी कंपन्यांच्या उत्पादनासंबंधी, योग्य ते तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी 'धर्मराज्य पक्ष' शंभर टक्के प्रयत्नशील राहणार आहे. तसेच, नवी मुंबईच्या विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या स्थानिक भूमिपुत्रांना साडेबारा टक्के भूखंड देण्याचा निर्णय प्रशासनाने देऊनही, आजतागायत त्याचे घोंगडे भिजत ठेवलेले आहे. **'धर्मराज्य पक्षा'ने वेळोवेळी स्थानिकांच्या वतीने पुकारण्यात आलेल्या आंदोलनात सहभागी होऊन, आपला पाठींबा दर्शविलेला आहे. याच पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांच्या पायाखालची जमीन शाबूत ठेवणारा, प्रकल्पग्रस्तांचा नेता व भूमिपुत्रांचे आराध्यदैवत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबईतील विमानतळाला देण्यात यावे यासाठी, अनेक आंदोलने झाली आणि त्यात स्थानिक भूमिपुत्रांच्या साथीने 'धर्मराज्य पक्षा'ने सातत्याने 'दिबां'च्या नावाला पाठींबा दिलेला आहे. पनवेल महानगरपालिकेने नागरिकांवर लादलेला जिझिया कर रद्द करण्यासाठी, पनवेलकरांचे आंदोलन सुरु आहे. दि. १० मार्च-२०२३ रोजीच्या सिडको आणि पनवेल महानगरपालिका यांच्यात, पायाभूत सोयी-सुविधांच्या झालेल्या हस्तांतरणाच्या करारानुसार, सिडकोच्या मालकीच्या सेवा-सुविधांचा ताबा, पनवेल महानगरपालिकेने दि. १ डिसेंबर-२०२२ रोजीपासून घेतलेला असतानाही, पनवेल महानगरपालिका मात्र, २०२१ पासूनची मालमत्ता कर आकारणी वसूल करीत आहे. या अन्यायी प्रशासकीय लुटीविरोधात 'धर्मराज्य पक्ष' आक्रमकपणे पनवेलकरांवरील हा जिझिया कर रद्द करण्यासाठी वचनबद्ध राहणार आहे.** त्याचबरोबर, कर्जत तालुक्यात मोठ्याप्रमाणात विकासकामे प्रलंबित आहेत. पाली-भुतवली धरण १९८४ साली बांधण्यात आले; मात्र, धरण वापरात नसल्याने पाणीसाठा मृत झालाय. परिणामी, दुर्लक्षित असलेल्या धरणात वर्षा सहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांचे, बुडून मृत्यू झाल्याच्या दुर्घटना दरवर्षी घडत असतात. या धरणाचे पाणी शेतकऱ्यांना मिळावे यासाठी, 'धर्मराज्य पक्ष' प्रयत्नशील राहणार आहे. दरम्यानच्या काळात, जलसिंचन घोटाळा वादग्रस्त ठरल्याने, रखडलेल्या कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरण आता, सिडकोला देण्यात आले आहे. मात्र, त्याच्या पाणी वाटपावरुन वाद आहेत. हा वाद सामंजस्याने संपुष्टात आणून, वाढत्या नागरीकीकरणाच्या दृष्टीकोनातून, कर्जतकरांना पाणी मिळाले पाहिजे यासाठी 'धर्मराज्य पक्ष' प्रयत्न करणार आहे. कर्जत तालुका हा, ग्रीन झोन असल्याने, येथील जंगल परिसरात आदिवासी समाज पिढ्यानपिढ्या वास्तव्यास आहे. नियमानुसार, आदिवासी/कातकरी बांधवांसाठी वनहक्क जमीन कायद्याची अंमलबजावणी केलेली असतानाच, त्याची पूर्तता होताना दिसत नाही. **ग्रामीण भागातील जनतेला घरकुल तसेच, शासकीय योजनांचा पुरेपूर लाभ मिळावा, जोडरस्त्यांचे काम पूर्ण व्हावे, वाड्यापाड्यांतील पाणीटंचाई कायमस्वरुपी दूर व्हावी, आरोग्ययंत्रणा सक्षम व्हावी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांत गावागावांतील जनतेला त्वरित उपचार मिळावेत यासाठी, 'धर्मराज्य पक्ष' वचनबद्ध राहणार असल्याची ग्वाही, ३३-मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार महेश ठाकूर यांनी, यावेळी पत्रकारांशी बोलताना दिली.**






'मंगळसूत्रा' वर दांभिकपणे बोलणारा, हाच माणूस, अश्लाघ्य पद्धतीने सोनिया गांधींना काँग्रेसची 'विधवा' म्हणतो आणि शशी थरुरसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या व्यासंगी-विद्वान राजकारण्याला, त्यांची '५० कोटींची मैत्रीण' म्हणत, जाहीररित्या हिणकसपणे हिणवतो आणि अर्णव गोस्वामीसारख्या मेंदूविक्या-दलाल 'गोदी-मिडीया' पत्रकाराकडून, त्यांच्याविरुद्ध कथितरित्या 'मिडीया-ट्रायल' चालवतो? मणिपूर-महिलांवरील, महिला-पहेलवानांवरील, उत्तराखंडच्या अंकिता कोठारी व गुजराथच्या बिल्कीस बानोवरील लैंगिक अत्याचार-शोषणावर बोलताना दातखीळ बसते; पण, आपल्या धर्मविद्वेषी-वाक्ताडनातून आपला 'अखंड हिंदुस्थान... खंड खंड हिंदुस्थान' होऊ शकतो; हे, राजकीय-स्वार्थापोटी आंधळे बनलेल्याच्या गावीही नसावं? नेमके कुठल्या दिशेने चाललोय आपण??

oooooooooooo

मणिपुरच्या दंगलीत नग्न करुन धिंड काढलेल्या, बलात्कारानंतर अत्यंत क्रूरपणे हत्या केल्या गेलेल्या...त्या अभागी महिलेच्या 'मंगळसूत्रा'चा हिशोब द्यायचं राहीलं बाजुला; अहो, साधी मणिपूरला भेट देण्याची 'छाती' नसलेला माणूस, मंगळसूत्राचा बादरायण विषय काढून काँग्रेसच्या नावाने शिमगा करतोय? हीच वेळ आहे; ती त्यांच्याकडे, हकनाक मारल्या गेलेल्या ४० CRPF जवानांच्या पत्नींच्या 'मंगळसूत्रा'सह असंख्य भारतीय महिलांच्या मंगळसूत्राचा हिशोब मागण्याची! शेतकऱ्यांचं उत्पन्न पाच वर्षांत दुप्पट होण्याऐवजी...दुप्पट-तिप्पट झाल्या, त्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या! गुजराथी-लॉबीच्या भांडवलकेंद्री नृशंस राजकारणातून, कर्जबाजारीपणामुळे बांधाबांधावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतायत...तरीही, मूळ मुद्दे बाजुला सारले जातायत?

# 'कच्चाथिवू का कच्चाचिट्ठा' सिर्फ खुला ही नहीं...
# मोदी-शहा सरकार के 'मुँहपर तमाचा' बनकर सामने आ गया...!!!

आपल्या पक्षीय-रिवाजानुसारच, राजकारणात 'विषाची आणि द्वेषाची शेती' करणारा, अन्नामलाई नावाचा एक तामिळनाडुचा तथाकथित भाजपाई 'फायरब्रँड' नेता... एक दिवस उठतो काय, तब्बल ५०वर्षांपूर्वी हस्तांतरित झालेल्या 'कच्चाथिवू' बेटाबाबत, भारत-श्रीलंकेदरम्यान झालेल्या करारासंदर्भात केंद्र-सरकारच्या परराष्ट्रखात्यात 'माहिती-अधिकार अर्ज (RTI) टाकतो काय आणि सरकारकडून त्यावर तत्काळ उत्तर येतं काय...सगळाच, 'मोदी है, तो मुमकिन है' असा, 'मोदी-ब्रॅण्ड'चा ठरवून घडवलेला चमत्कार!

**'अगा जे, त्यास्वरुपी काही घडलेचि नाही', असं असताना...जाणिवपूर्वक सगळे संदर्भ तोडून, धड 'अर्धसत्य'ही नसलेली, अत्यंत बेजबाबदार व देशाच्या परराष्ट्र-व्यवहारासाठी अत्यंत घातक अशी (पण, निवडणुकीत मतं मिळवण्यास कदाचित हातभार लावू शकणारी), धादांत असत्य-मांडणी...पं. नरेंद्र मोदींनी आपल्या तामीळनाडुच्या निवडणूक-प्रचार दौर्‍यात केली व माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधीवर (म्हणजेच, पर्यायाने राहुल गांधींवर व काँग्रेसवर) एकच टीकेची झोड उठवली.**




**...काय तर म्हणे, इंदिरा गांधींनी देशाच्या सार्वभौमत्व, अखंडतेबाबत तडजोड केली व देशाचं मोठं नुकसान केलं! तामिळनाडुत धड एक जागा मिळण्याची शक्यता तशीही नाही (म्हणूनच, नरेंद्र मोदींच्या ताटाखालचं मांजर असलेला 'निवडणूक-आयोग', तिथल्या लोकसभा-निवडणुका १९ एप्रिलला एकाच टप्प्यात 'चटावरच्या श्राद्धा'सारख्या उरकतोय...महाराष्ट्रात मात्र, लोकसभा-निवडणूक पाच टप्प्यात); पण, जाता जाता देशातलं वातावरण 'थापेबाजी व दिशाभूल' करुन साफ ढवळून टाकण्याचा व त्यातून, काही मतं चुकूनमाकून इकडेतिकडे वाढली तर पहाण्याचा, हा अश्लाघ्य व अक्षम्य राजकीय-प्रयोग होय!**

'ऑपरेशन ब्लू-स्टार'च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी 'शीखधर्मीय अंगरक्षक' हटवण्याविषयी वारंवार गंभीर सूचना देऊनही, राष्ट्रीय-अखंडतेबाबत भारतीय-जनतेत चुकीचा संदेश जाऊ नये, म्हणूनच केवळ त्या अंगरक्षकांना, जीवावरचा उघड धोका पत्करुनही धैर्याने, विश्वासाने आपल्या सुरक्षासेवेत कायम ठेवणारी निडर-बेडर रणरागिणी व प्रखर-जाज्वल्य देशभक्त म्हणजे, इंदिरा गांधी (दुसर्‍या बाजुला, आठवा...५ जानेवारी-२०२२रोजी पंजाब दौर्‍यावर असताना एका उड्डाणपुलावर निदर्शक-शेतकर्‍यांनी पंतप्रधानांचा ताफा थोडावेळ नुसता अडवून ठेवल्यानंतर, पं. नरेंद्र मोदींनी भयभीत होऊन सुरक्षेतल्या त्रुटीबद्दल केलेलं आकांडतांडव)!

**...देशात वादळ उठवणार्‍या 'कच्चाथिवू' बेटाच्या समझोत्याविषयीची, पं. नरेंद्र मोदींची राजकीय क्षुद्रवृत्ती दर्शवणारी निवडणूक-प्रचारातली असभ्य चलाखी आणि त्याचे होऊ घातलेले गंभीर आंतरराष्ट्रीय परिणाम, याविषयी थोडक्यात विवेचन करुया....**

- मुळातूनच कच्चाथिवू, हे केवळ २८५ एकर क्षेत्रफळात पसरलेले एक 'निर्मनुष्य बेट', जे भारताचा भूभाग कधिच नव्हतं...स्वातंत्र्य मिळण्याअगोदरपासूनच (ब्रिटीश-सिलोन, म्हणून जेव्हा श्रीलंका देश ओळखला जात होता) म्हणजे, १९२१पासूनच तो भूभाग विवादीत होता.
- वर्ष-१९७४ला तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधींनी अत्यंत मुत्सद्दीपणे व सामरिक दृष्टीकोनातून देशाच्या दीर्घकालीन हितासाठी श्रीलंकेच्या तेव्हाच्या पंतप्रधान सिरीमाओ भंडारनायके यांच्याशी द्विपक्षीय करार करुन 'कच्चाथिवू' बेटाचा रितसर ताबा श्रीलंकेला दिला...
- इंदिरा गांधींनी 'कच्चाथिवू' बेटाचा ताबा श्रीलंकेला दिला...एवढंच सांगून, पं. नरेंद्र मोदी एक मोठं वादाचं मोहोळ उठवून देत सोयीस्कररित्या गप्प बसतात. पण, त्याबदल्यात भारताला रामेश्वरमच्या दक्षिणेकडचा भूभाग श्रीलंकेकडून मिळाला (जो कन्याकुमारीचा भाग बनला) व त्या परिसरातील तेल-नैसर्गिक वायू उत्खननाचे महत्त्वपूर्ण अधिकार भारताला मिळाले, हे सांगत नाही आणि हे ही सांगत नाहीत की, १९७१च्या बांगलादेश निर्मितीच्या युद्धात, श्रीलंकेने पाकिस्तानला आपल्या देशात पाकिस्तानच्या विमानांना इंधन भरु देण्याची, जशी सोय उपलब्ध करुन दिली होती...तशी ती पुन्हा कधिही उपलब्ध करुन न देण्याची व श्रीलंकेला 'पाकिस्तानचा हवाईतळ' म्हणून वापर करु न देण्याची, सामरिकदृष्ट्या महत्त्वाची अट इंदिरा गांधींनी करारात घातली होती.
- नरेंद्र मोदी हे सांगत नाहीत की, त्याच वर्षी इंदिरा गांधींनी जवळपास १७ लाख एकराचा ईशान्यपूर्व सिक्कीमचा भूप्रदेश (चीनसारख्या घातकी शत्रूच्या संदर्भात, संरक्षण व दळणवळणासाठी अतिशय महत्त्वपूर्ण) भारताला जोडून घेत 'सिक्कीम' हे भारताचं २२वं नवं राज्य बनवलं.
- **नरेंद्र मोदी हे ही सांगत नाहीत की, कच्चाथिवू हस्तांतरित करण्यापूर्वी फक्त तीनच वर्ष अगोदर, स्व. इंदिरा गांधींनीच पाकिस्तानचे दोन तुकडे करुन बांगलादेशाची निर्मिती केली व पाकिस्तानला कायमचा पंगू बनवला...उगीचच का अटलबिहारी बाजपेयी इंदिरा गांधींना 'दुर्गेचा अवतार' म्हणाले होते?**
- **याच बांगलादेशाला, वर्ष-२०१५मध्ये नरेंद्र मोदी सरकारने सीमातंटा सोडवण्याकामी केलेल्या कराराद्वारे, सुपीक व मोठ्याप्रमाणावर मनुष्यवस्ती असलेला जवळपास १०हजार एकराचा 'अतिरिक्त भूभाग' देऊन टाकला...मग, हा देखील कच्चाथिवू-हस्तांतरणापेक्षा अंदाजे ३५ पट मोठा (१०,००० एकर × २८५ एकर) 'राष्ट्रद्रोह'च मानायचा का?**
- आजचे परराष्ट्रमंत्री असलेले एस. जयशंकर, हे १९८८ ते १९९०पर्यंत श्रीलंकेत भारतीय राजदूतावासात 'प्रथम सचिव' पदावर होते व श्रीलंकेतल्या भारतीय-शांतिफौजेचे राजकीय-सल्लागार होते...याचाच अर्थ, त्यांना हा सगळाच घटनाक्रम यथास्थित माहित्येय; म्हणूनच, ते या मोदींच्या बेजबाबदार वाक्ताडनावर भाष्य टाळण्यासाठी तोंड लपवून दूर पळतायत! जयशंकरांनी असं तोंड लपवण्यापेक्षा, भारतीय-अर्थव्यवस्था गटांगळ्या खायला लागल्यामुळे लोकसभा-निवडणूक न लढवण्याची घोषणा करत, ज्याप्रकारे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अलगद निवृत्ती घेतल्यात जमा आहे... त्यांच्यासारखीच निवृत्ती घेऊन सार्वजनिक-जीवनातून चालतं व्हावं, हे उत्तम...त्यामुळे, देशाची घसरणारी इभ्रत तरी थोडी वाचेल.
- नरेंद्र मोदींच्या राजवटीत अजून एका सख्ख्या शेजारी देशाची अवकृपा, भाजपाच्या राजकीय लाभासाठी आपण ओढवून घेतलीय. नरेंद्र मोदींच्या 'कच्चाथिवू' बेटासंबंधीच्या वादग्रस्त विधानामुळे श्रीलंकेन जनतेत संतापाचा मोठा लोळ उठलाय व तेथील जनताच नव्हे; तर, मंत्री देखील त्याविरोधात रस्त्यावर उतरलेत (जे 'गोदी-मिडीया'तून कधिच दाखवलं जाणार नाही)
- या अशा भारतातल्या गढूळ वातावरणामुळे भारत, अमेरिका, जपान व ऑस्ट्रेलिया या देशांनी मिळून बनलेल्या 'सामरिक सुरक्षा संवादा'तील (QUD OR Quadrilateral Security Dialogue) भारताचा सहभागही धोक्यात आल्याचं बोललं जातंय.

**परराष्ट्र धोरण हे कुठल्याही राजकीय पक्षाचं म्हणून खास वेगळं धोरण असू शकत नाही, ते संपूर्ण राष्ट्राचं सकल-धोरण असतं, असं अटलबिहारी बाजपेयी, तत्कालिन परराष्ट्रमंत्री, या नात्याने बोलून गेलेत.**

सध्या, श्रीलंकेत भारताविरुद्ध उसळलेला प्रचंड रोष पहाता.... 'परराष्ट्र-धोरण', हा काय, भातुलकीचा पोरांचा खेळ आहे काय, हा प्रश्न विचारावासा वाटतो.

'अब की बार ट्रंप सरकार' असं अमेरिकेत जाऊन भारताच्या पंतप्रधानांनी बेधडक म्हटलेलं चालतं; पण, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल अटक प्रकरण व लोकसभा-निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसची बँक-खाती गोठवणं वगैरे बाबींवरुन जर्मनी, अमेरिका, संयुक्त-राष्ट्रसंघ ...पृष्ठ क्र. ४ वर

## मोदी-शहा सरकार के 'मुँहपर तमाचा'

...पृष्ठ क्र. ३ वरुन

(UNI) आणि म्नेस्टी इंटरनॅशनल यांनी भारतावर कडक टीका केलेली मात्र, यांना चालत नाही...हा दुटप्पीपणा कुठला?

**गुजराथच्या पश्चिम किनारपट्टीवरील सर क्रीक आणि नारायण-सरोवर पट्ट्यातील भारतीय कोळ्यांच्या हजारो कोटींच्या मासेमारीवर (जिथे, औषध-उद्योगासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असा लाखो रु. किंमतीचा घोळ मासा मिळतो)... 'No Fishing Zone' जाहीर करुन भारतीय कोळ्यांसाठी (जे भाजपाचे मतदार नसल्याचा एकप्रकारे सूड उगवला जातोय) कठोर बंदी लादली गेलीय; पण, पाकिस्तानी कोळ्यांना मात्र, मासेमारीसाठी पूर्ण मोकळीक दिली गेलीय...मग, 'देशद्रोही' कोण? या घटनाक्रमाचा, पाकिस्तानच्या 'हब-पॉवर'सारख्या (HubPower) कंपन्यांनी 'भाजप'ला दिलेल्या करोडोंच्या इलेक्टोरल-बॉण्डच्या छुप्या देणग्यांशी, काही संबंध आहे काय, हे शोधायला नको?**

ज्यांना इतिहास घडवता येत नाही; ते इतिहास बिघडवण्याचं किंवा विकृतरित्या सांगण्याचं काम या देशात करतायत, करत आलेत...कित्येक वर्षांपूर्वी अत्यंत सन्मानजनक व सौहार्दपूर्ण स्थितीत मिटलेल्या वादांवर काळाने धरलेली खपली, निहीत राजकीय-स्वार्थापोटी काढून जखम उघडी होऊ देणं, रक्त भळभळा होऊ देणं...हीच, भाजपाई-संघीय मानसिक-विकृती आहे! त्या विकृतीवर जगणारी, पोसली जाणारी शिक्षित-अशिक्षित 'अंधभक्तां'ची एक मोठी फौज भारतात मौजूद आहे.

**कुत्रा, जसं कुठलं तरी जुनंपानं हाडूक गवसलं की, चघळत बसतो... त्याच्या स्वतःच्याच तोंडातून हाड चघळत बसल्यामुळे शेवटी रक्तस्त्राव होतो. तो ते रक्त आनंदाने चाटत बसतो...ते रक्त, त्याचं स्वतःचंच असतं; हे त्याला आकळत नाही. हीच, विकृत-विक्षिप्त अवस्था, देशातील या 'अंधभक्त-जमाती'ची आहे... ती जमात, आता कच्चाथिवू-बेटाचं, जमिनीतून उकरुन काढलेलं हाडूक, देशातल्या निवडणुका संपेपर्यंत चघळत बसेल...रक्त सांडेपर्यंत!**

**...सर्वसामान्य जनतेनं मात्र, त्यापासून पूर्ण सावध राहून, आपलं रक्त वाया घालवू नये, म्हणजे मिळवलं!**

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# दलित-लीडरशिप, दलित समाजाशी गद्दार का आहे...???

## शोषकांच्या 'फिलॉसॉफी'ने शोषितांची लढाई लढली जाऊ शकते का?

**माझे वडील वयाच्या १४व्या वर्षी गिरणी कामगार म्हणून कामाला लागले. त्याच वर्षापासून आंबेडकरी चळवळीचं कामही करायला लागले... त्यांना काही थोडा काळ आंबेडकरांचा सहवास मिळाला, त्याचा त्यांना खूप अभिमान होता. घरात आंबेडकरांची पुस्तकं, वृत्तपत्रातील कात्रणांच्या फाइल्स, तीच आमची संपत्ती. संध्याकाळी सगळे भाऊ-बहीण जेवल्यानंतर, दोन-तीन तास वडिलांबरोबर पॉलिटिक्सवर चर्चा, हा जवळपास रोजचाच भाग.**

ते स्वतः बी. सी. कांबळे यांच्या गटात होते. घरात चळवळीतले कार्यकर्ते आले की, पन्नासजण तरी यायचे आणि नेहमी यायचे. कारण, स्टेशनजवळ घर, त्याचा आम्हाला आनंद आणि अभिमान दोन्ही असायचा. नंतर रेल्वेत नोकरी मिळाल्याने, ते 'CPM'च्या युनियनमध्ये काम करायला लागले. काही डाव्या विचारांच्या लोकांशी ओळख झाली. पहिल्यांदा अण्णाभाऊ साठे वाचले. वडिलांची बांधिलकी मात्र, आंबेडकरी चळवळीशी राहिली, मरेपर्यंत...

**ते मरायच्या आधी, ३/४ वर्ष मी 'कम्युनिझम' वाचायला लागलो होतो. तसे ते कधिही झुकले नव्हते.. मरणाच्या आधी वर्षभर मी त्यांना प्रश्न विचारला की, आंबेडकरी चळवळीतले नेते, मोठ्याप्रमाणावर काँग्रेसला विकले गेले; पण, कम्युनिस्ट मात्र, एकही विकला गेला नाही, याचं कारण काय असेल? खूप रडले ते, पण त्यांनी उत्तर दिलं नाही....**

**कम्युनिस्ट झाल्यावर बघितलं, काय जबरदस्त 'कमिटमेंट' एकेका नेत्याची आणि कितीही वाईट परिस्थिती असली; तरी, कुणीही 'कम्युनिस्ट-नेता' कधिही विकला गेला नाही. (अपवाद असेल तर मला माहित नाही.) माणसाचं विकणं, हे त्याच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून नसून, त्याच्या तत्त्वज्ञानाच्या निष्ठेवर आणि लोकांशी जुळलेल्या नाळेवर अवलंबून असतं!**

हे बरोबर आहे की, कम्युनिस्ट नेते मोठ्याप्रमाणावर मध्यमवर्ग किंवा उच्च मध्यमवर्गातून आले होते. पण, हे १०० टक्के सत्य नाही. अगदी गरीब घरातूनदेखील कम्युनिस्ट-नेते आले होते. तेही विकले गेले नाहीत किंवा काँग्रेसला सामील झाले नाहीत. अगदी, एकेकटेदेखील... जसे, आंबेडकरी चळवळीत मोठ्या प्रमणावर झालं! जे मध्यमवर्गीय किंवा उच्च-मध्यमवर्गीय होते, तेही सर्व संपत्ती पार्टीला देऊन किंवा कुळांना वाटून पार्टीत मोठ्या पदावर पोचले. आजही कम्युनिस्ट पार्टीत, लोक खासदारकीचा सर्व पगार/भत्ते पार्टीफंडात जमा करतात आणि तिथून मिनिमम पगार घेतात...

तत्त्वज्ञान रक्तात किती मुरलंय याच्यावर अवलंबून आहे, गरिबी/श्रीमंतीवर नाही... आज चार-दोन रुपड्यांसाठी आणि पदासाठी, संघ-परिवारालाही स्वतःच्या जात/वर्ग शत्रूला, स्वतःला विकणाऱ्या आंबेडकरी/दलित चळवळीतील नेत्यांना बघून फार फार वाईट वाटतं आणि मी, आज त्याचं उत्तर शोधायचा प्रयत्न करतो तेव्हा, एकच उत्तर मिळतं... बाबासाहेबांनी शेवटच्या वर्षात कम्युनिझमला केलेला विरोध... त्यामुळे, ते एकप्रकारे कॅपिटॅलीझमचं समर्थन करतायत, अशी जणू धारणा बनली. 'कॅपिटॅलीझम', एकदा स्वीकारला की, प्रत्येक गोष्ट कमोडिटी होते. नेतेदेखील कमोडिटी होतात Price Tag सहित आणि ते स्वतःबरोबर जनतेलाही विकतात!

**एकदा कॅपिटॅलीझम-फिलॉसॉफी म्हणून स्विकारल्यावर, पैशावर माणसाची किंमत ठरते. सगळ्यात गरीब तो कमी महत्त्वाचा. दलाली करुन कार्यकर्ते पोसू शकेल आणि स्वतःची तुंबडी भरु शकेल, त्याला मान आणि त्याचीच नेतेगिरी. श्रीमंत झालेल्या बहुसंख्य दलितांनी, सगळ्यांशीच संबंध तोडलाय. कार्यकर्तेही, जो नेता जास्त पैसे देऊ शकेल; त्याच्याच मागे जातात... कंगनासारखी हजार प्रकरणं असून, आठवलेंच्या मागे खूप कार्यकर्ते आहेत.**

शोषकांच्या फिलॉसॉफीने, शोषितांची लढाई नाही लढता येत. कम्युनिस्ट, भले 'पोथीवादा'मुळे stagnant झाले, पण विकले गेले नाहीत. आंबेडकरी चळवळीच्या दुर्दशेचे हे एक कारण आहे का? कॅपिटॅलीझमचं समर्थन करुन शोषितांची चळवळ कशी चालेल, कळत नाही...!!!

***....चंदू सिंधू***

(सद्यस्थितीत, 'चंदू सिंधू', या डाव्या-विचारांच्या सामान्य कार्यकर्त्याच्या, वरील 'शुद्धलेखन-सुधारित' फेसबुकवरील संदेशाचं फार फार महत्त्व आहे...आंबेडकरी-समाजातीलच नव्हे; तर, स्वार्थापोटी व भितीपोटी, कामगार-चळवळींपासून इतर अनेक जाज्वल्य सामाजिक-राजकीय चळवळींच्या गळ्याला नख लावणाऱ्या...आजुबाजुला पसरलेल्या हिणकस व समाजघातकी प्रवृत्तींचं 'शवविच्छेदन' करणारं, हे जळजळीत सत्यकथनच! ***...राजन राजे***)




***'पराभवाच्या छाया, भिववीत हृदया', अशा दारुण अवस्थेत फेकूगिरी'चा रोग हाडामांसी भिनलेला हा माणूस, 'उचलली जीभ लावली टाळ्याला' अशागत वाटेल ते बरळू लागलाय! धार्मिक भावना भडकविण्यासाठी घरातील सोनंनाणंच नव्हे; तर, स्त्रियांच्या गळ्यातील 'मंगळसूत्र'देखील काँग्रेस काढून घेऊन मुसलमानांना वाटून टाकणार असल्याचे, त्याने बांसवाडा (राजस्थान) येथे फुत्कार टाकले आणि, तो निर्गल-गर्हणीय प्रकार नागपूर संघ-कार्यालयाच्या रात्रभराच्या भेटीनंतर पुढे ठरवून चालूच ठेवला गेलाय... इतकी, ही भाजपाई-संघीय माणसं नीच-अधम वृत्तीची आहेत. हे कोण बोलतोय; तर, ज्याने स्वतः मंगळसूत्राचं पावित्र्य-मान कधि राखला नाही, पतिव्रता जशोदाबाईला नांदवलं तर नाहीच; पण, आपल्या सासूचं अंत्यदर्शनही तिला घेऊ दिलं नाही, असा एक हृदयशून्य माणूस!***

# मयूर लंकेश्वर लिहितात.....

भाजपाचा सगळ्यात मोठा हक्काचा भक्त म्हणावा असा मतदार, हा शहरी भागातला 'कॉर्पोरेट इंडिया' मधला पन्नाशी-साठीच्या आतला आहे...यात ३० ते ४० वयोगटातील तरुणांची संख्या लक्षणीय आहे.

**या पिढीने आधुनिकतेचे तंत्र, जगण्याच्या भौतिक व्यवहारात उतरवले असले तरी, ही पिढी बिनडोक आणि मेंदूचा भुसा झालेल्या बहुसंख्यकांची अधिक आहे. मी स्वतः टिपिकल कॉर्पोरेट इंडियाचा गेली १८ वर्षे भाग आहे, त्यामुळे काही गोष्टी अतिशय बारकाईने निरीक्षण केल्या आहेत...**

या पिढीत भारताच्या राज्यघटनेबद्दल कमालीचे अज्ञान आहे, आरक्षणाच्या पॉलिसीबद्दल पराकोटीचा द्वेष आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे, सर्वाधिक उपभोग घेणारे हे तरुण, वैचारिकतेच्या बाबतीत संघ भाजपाने प्रसवलेल्या विषावर किक अनुभवत आहेत. हे नेमके का घडले? कसे घडले याचा विचार करणे, भाजपविरोधी राज्यकर्त्यांना आवश्यक असणार आहे.

मला हे तरुण झोंबी फॅक्टरीमध्ये मनुफॅक्चरिंग केलेले प्रॉडक्ट भासतात. वरकरणी सभ्य सोज्वळ दिसणारी; मात्र, अंतरंगात राक्षसी साच्यात घालून तयार केलेली ही फौज भाजपाचे बलस्थान आहे.

माझे पूर्वाश्रमीचे अनेक मित्र, अनेकानेक ऑफिस सहकारी, ह्या 'झोंबी लँड'चा एक भाग म्हणून गेली दहा वर्षे अभिमानाने मिरवत आले आहेत!

**देशविदेशातील पंचतारांकित ठिकाणी काम करणारी, उच्चपदावर विराजमान असणारी, पुणे, मुंबई, बँगलोर येथे हमखास स्वतःच्या मालकीहक्काचे एक-दोन फ्लॅट असणारी, बुडाखाली आलिशान गाडी असणारी, हातात महागडा फोन-टॅब्लेट असणारी, नवरा-बायको दोघे खोऱ्याने पैसे ओढत असणारी, पोरं वार्षिक दोन-अडीच लाख रुपये फी असणाऱ्या, फाईव्ह-स्टार हॉटेलला थोबाडीत हाणेल अशा, लॉबी असणाऱ्या शाळेत घातलेली, एका क्लिकवर जगातील वाट्टेल त्या सुख-सोयीचे अमाप लेपर्रािंिलैप करु शकणारी ही तरुण मंडळी, भाजपाच्या विखारी राजकारणाचे प्रमुख अंग आहे. वरकरणी निरुपद्रवी भासणारी ही जनता, एखाद्या ड्रग अँड्रीक्टपेक्षा कमी झिंगलेली नाही. ही झिंग कसली आहे आणि हा हँगओव्हर कसा मोडायचा? याचा भाजपेतर राजकारण्यांनी विचार करणे अत्यावश्यक आहे.**

जागतिकीकरणाचा सर्वात मोठा फायदा मिळालेली ही, पांढरपेशी-पिढी वरकरणी पोशाखी, फाडफाड इंग्लिश बोलणारी, त्यातून फायदे उपटणारी असली; तरी, मुळात तिच्यात देशाच्या सनातनी संस्कृतीबद्दल, हुकुमशाहीबद्दल, अफाट आकर्षण असणारी आहे. ऑफिसच्या किंवा वैयक्तिक कामासाठी मॅकबुक वापरताना, व्हॉटसअप विद्यापीठात प्रसवल्या जाणाऱ्या वैदिक छद्म-विज्ञानाबद्दल, वेदात कसं क्वांटम कम्प्युटिंगबद्दल आधीच लिहून ठेवलं आहे, अशा गाढवलेंड्यांची माळ गळ्यात घालून तावातावाने मिरवणारी ही पिढी आहे. साधं रस्त्यात ट्रॅफिक जाम झालं तरी, देश सुधरवायला हुकूमशहाच पाहिजे अशा स्वरुपाचे अत्यंत उथळ आकलन असणारी, ही लोकं आहेत...

**जे जे खाजगी ते ते उत्कृष्ट, जे जे सरकारी ते ते निकृष्ट, अशा प्रोपोगंडाला बळी पडलेली ही सामाजिक-राजकीय-निर्बुद्ध आर्मी, भाजपाचा फ्रंट लाईन डिफेन्स आहे. तो मोडून काढणे महत्वाचे आहे!**

काही वर्षांपूर्वी, वर्ष-२०१८च्या आसपास, कामानिमित्त अमेरिकेला जाताना एक कलिग मुलगी मला म्हणाली होती की, अगर तुम US जा रहे हो तो, वहा के लोग इन-जनरल हमारे इंडिया के पॉलिटिक्स बारे मे बहोत निगेटिव्ह राय रखते है, खास करके भाजपा के बारे मे, तुम उनको ऐसा वैसा कुछ बोलने का चान्स मत देना, हमारा देश रिप्रेझेंट करना तिने बायडिफॉल्ट मला, मी तिच्याच फौजेचा भाग आहे असे गृहीत धरले होते. **मोदी किंवा भाजप म्हणजेच आपला देश, मोदीविरोध किंवा भाजपविरोध म्हणजे देशद्रोह, अशी अडाणचोट धारणा घेऊन ती मला शहाजोगपणे सल्ले देत होती. वर्णव्यवस्था ही कशी छान यंत्रणा होती आणि जातीचे भेद इंग्रजांनी निर्माण केले?** यावर तिचा ठाम विश्वास होता. त्यानंतर काही काळाने तिला माझं पॉलिटिक्स माहित पडलं आणि माझ्याकडून वादात चार-दोन शाब्दिक झापडा खाल्ल्यानंतर, तिने माझ्या नादाला लागणे सोडले. हे एक केवळ प्रातिनिधिक उदाहरण आहे. अशी असंख्य व्हाईट कॉलर लोकं आपल्या आसपास आहेत.

**जय श्रीराम बोंबलत, अमेरिकेतल्या रस्त्यांवर धिंगाणा करत हिंडणारी ही लोकं आहेत. त्यात तुमचे माझे मित्र, नातेवाईक अनेक आहेत. हा माज हा इग्नोरंस मुळात यांच्यात कुठून आला? तो कुणी वाढू दिला? कसा वाढला? स्वातंत्र्यानंतर या माजाला, कुठल्या सांस्कृतिक रचनेत खतपाणी घातले गेले? याचे सखोल विश्लेषण, विरोधीपक्षांनी केले पाहिजे... तरच, या पॉश-विषारी फौजेचे वैचारिक-मानसिक नसबंदीकरण केले जाऊ शकते.**

निवडणुका जवळ आल्या की, पैशासाठी मते विकू नका हा सल्ला गरिबांना दिला जातो; मात्र, भाजपासाठी आपला आत्मा विकलेल्या या सुशिक्षित उच्चभ्रू, जिवंत-मुड्या गर्दीचे काय करायचे? हा मोठा प्रश्न आहे !!!

---

## एका बातमीनुसार, भारताच्या अर्थमंत्र्यांकडे एवढाही पैसा नाही की, त्या लोकसभा-निवडणूक लढवू शकतील आणि म्हणूनच त्यांनी लोकसभा-निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केलाय.

### यासंदर्भात, काही प्रश्न संभवतात, त्यांची चर्चा व्हायला हवी.....

१) निर्मला सीतारमण यांच्या पूर्वसुरींनी (म्हणजेच, दिवंगत माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी) बेकायदेशीरपणे, गैरसंविधानिक पद्धतीने जो 'इलेक्टोरल-बॉण्ड' घोटाळा केलाय; त्या घोटाळ्यातील पैसा, आजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या निवडणूक-खर्चासाठी पोहोचण्याचा मार्ग रोखणारा किंवा रोखणारे 'शुक्राचार्यांचे झारीतील डोळे' कुणाचे आणि ते फोडून आपला कार्यभाग साधण्याकामी, आमच्या अर्थमंत्री बाईसाहेब, तेवढ्या 'सक्षम' नाहीत का? ...की, तो मोठा पैसा, विरोधी-पक्षांचे आमदार-खासदार फोडून त्यांची राज्य-सरकारे पाडण्याकामीच संपून गेलाय??

२) आमच्या 'महिला' अर्थमंत्री बाईसाहेबच जर, एवढ्या 'दीनदुबळ्या' असतील; तर, पं. नरेंद्र मोदी कुठल्या 'नारीशक्ति'च्या सक्षमीकरणाविषयी सदैव बाता मारत असतात? ...की, यांच्या बेगडी व पुरुषसत्ताक-पुरुषप्रधान 'संघीय-मानसिकते'त, महिलांना कायमच 'दुय्यम-स्थान' रहाणार आहे (आठवा, तुलसीदासांचं रामचरित मानस-सुंदरकांड चौपाई, ढोल गंवार सूद्र पसू नारी। सकल ताड़ना के अधिकारी।।)??

३) केंद्रीय गृहमंत्र्यांच्या एका बेजबाबदार व जाणिवपूर्वक दिशाभूल करणाऱ्या वक्तव्यानुसार, इलेक्टोरल-बॉण्ड घोटाळ्यातील पैसा, भाजपा-खासदारांच्या संख्येने विभागून 'सरासरी' काढली जायला हवी; म्हणजे, भाजपाला कितपत पैसा जास्त मिळाला, ते कळू शकेल...याचा अर्थ, उद्या देशातल्या बँका बुडवून परदेशात पळून गेलेल्या 'सगळ्या मोदीं'नी किंवा किंगफिशरवाल्या विजय मल्ल्याने देशाच्या बुडवलेल्या पैशाला सुद्धा, त्यांच्याकडील कामगार-कर्मचाऱ्यांच्या संख्येने भागून व तशी सरासरी काढूनच, प्रत्येकाच्या गुन्ह्याचं गांभीर्य ठरवायचं का? अशा बेफजूल सरासरी आपण काढायला लागलो; तर, एखाद्या तलावाची सरासरी खोली पाचच फूट आहे, बिनधास्त उतरा, असं 'अमित शहा' किंवा 'हरीश साळवे' टाईप डॅबिस-बुद्धीने, सांगणाऱ्यावर विसंबून तलावात बिनधास्त उतरणाऱ्या व सातआठ फूट खोलीच्या ठिकाणी बुडून मरणाऱ्या... एखाद्या बावळटासारखी अवस्था, 'अमित शहा-कथना'वर विसंबणाऱ्या भारतीय जनतेची व्हायची!

...शिवाय, एतच्-चलाखीसोबतच, या इलेक्टोरल-बॉण्ड घोटाळ्याच्या 'दोन नंबरी' पैशातूनच मोदी-शहा, २०१९ ची लोकसभा-निवडणूक आधी जिंकलेत आणि नंतरच, त्या बेकायदेशीर व्यवहारातूनच खासदारांची संख्या वाढलीय, या मूळ मुद्द्यालाच अमित शहा बगल देण्याची मखलाशी करतायत!

४) शक्ति, दोन प्रकारच्या असतात...एक 'दैवीशक्ति' व दुसरी 'आसुरीशक्ति'! कॉंग्रेस नेते व पंतप्रधानपदाचे प्रबळ दावेदार राहुल गांधी, 'आसुरी-शक्ति'विषयी बोलत असताना जाणिवपूर्वक 'ध' चा 'मा' करण्याची... पंतप्रधानपदाला अत्यंत अशोभनीय अशी, हिणकस दर्जाची 'कोटी किंवा चलाखी' करुन, राहुल गांधींवर नाहक हल्लाबोल करणारे व 'नारीशक्ति'विषयक, भंपकबाज भाषणं करणारे आपले भपकेबाज पंतप्रधान, आता आपल्याच मंत्रिमंडळातील अर्थमंत्र्यांच्या कथित दुबळेपणाविषयी काय बोलणार आहेत? ...की, महिला-पहेलवानांवरील, बिल्कीस बानोवरील किंवा मणिपूर-महिलांवरील भीषण अत्याचारांबाबत जसे, मिठाची गुळणी घेऊन सोयिस्कररित्या चूप बसले होते; तसेच ते याहीवेळी चूप बसणार आहेत काय??

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

**पार्श्वभूमी**...लोकसभा-निवडणुकीच्या धुमश्चक्रीत इंडिया-आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या, पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली की, भाषणं करण्याला आता फारसा अर्थ उरलेला नाही...ज्यांना एकदा देशाची सध्याची अवघड परिस्थिती नीट समजली, त्यांना ती समजलीच; म्हणूनच तर ते निष्ठेनं 'इंडिया-आघाडी'च्या नेत्यांसोबत आहेत. पण, जे बीजेपीवाले, संघवाले आहेत...ते काही तिथे नसतात आणि सर्वसाधारण जनताही हल्ली फारशी राजकीय सभांना वगैरे नसतेच. म्हणूनच लेख लिहून, संदेश लिहून भाजपाई हिंदुत्वाची सोंगढोंगं, त्यांची राजकीय-बदमाषी उघडी पाडणं...हे सध्या फार फार महत्त्वाचं काम आहे आणि हाती घेतलेल्या एखाद्या असिधारा-व्रतासारखं, ते मी पार पाडत आलोय, याहीपुढे पार पाडेनच...त्याला, तुमची साथ मिळेल, ही अपेक्षा बाळगतो. कारण, जिथून त्यांनी या देशातल्या 'लोकशाहीची पवित्र गंगा' मैली केलीय; त्या समाजमाध्यमांतूनच, मग ते व्हॉट्सप असो, फेसबुक असो, युट्यूब असो... तिथे जाऊनच, या 'मैल्या-गंगे'च्या शुद्धीकरणासाठी आपल्याला इलाज करावा लागेल. म्हणूनच, तर ते इतरांवर तुटून पडतात; पण, माझ्याविषयी त्यांना कितीही संताप आला (त्यांच्या 'हिट-लिस्ट'वर तर, मी केव्हाचाच आहे आणि म्हणूनच, अनेक खोट्या खटल्यांना व नको नको त्या प्रसंगांना तोंड द्यावं लागतं आहे, न डगमगता तोंड देणारच) तरी, समाजमाध्यमांतून व्यक्तिशः माझ्याविषयी फारसं बोलत नाहीत... कारण, जरा जरी, ते माझ्या अंगावर आले (ज्याची, मी वाटच बघतोय) तर, मी त्यांना अशातऱ्हेनं शिंगावर घेऊन आपटीन की, त्यांना साधं स्वतःच्या पायावर उभं रहाणं देखील मुश्किल होईल! त्यासाठीच, तुम्ही माझे संदेश सर्वत्र पाठवले पाहिजेत, पाठवत असालच... त्याला काही दिडक्या लागत नाहीत आणि खास मेहनतही लागत नाही, पण तोच अक्सीर इलाज आहे... त्यांना ते लेख, ते संदेश फार फार झोंबतात... त्यावर ते उत्तर देऊ शकत नाहीत, 'सहन होत नाही आणि सांगताही येत नाही' अशी फार मोठी पंचाईत आहे त्यांची. त्यातूनच मराठमोळ्या जनतेत मुळातून जागृती होऊ पहातेय...ती चेतना, तो वन्ही; असाच धगधगता, पेटता राहू द्या... एकदा का 'इंडिया-आघाडी' सत्तेवर आली की, तुम्हाला-आम्हाला सामान्य मराठी-माणसांसाठी फार मोठं काम करावं लागणार तर आहेच....धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# देशाच्या लोकशाहीचा 'DNA' सुरक्षित राखण्याकामी... 'NDA'ला का गाडायचं आणि 'इंडिया-आघाडी'ला का निवडायचं...याचं बिनतोड-सडेतोड दिग्दर्शन, ''इंडिया एक आयडिया'' या शीर्षकाखाली, एक खास जनजागरण-लेखमालिका

**...सादरकर्ते-राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**



**महाराष्ट्र राज्य, यंदाच्या लोकसभा-निवडणुकीत, सत्तापालट करण्यात निर्णायक भूमिका बजावणार, हे निःसंशयच!**

**देशाच्या लोकशाहीचा 'DNA' सुरक्षित राखण्याकामी...'NDA'ला का गाडायचं आणि 'इंडिया-आघाडी'ला का निवडायचं...याचं बिनतोड-सडेतोड दिग्दर्शन, ''इंडिया एक आयडिया'' या शीर्षकाखाली, सादर करीत आहोत एक खास जनजागरण-लेखमालिका... सादरकर्ते-राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

देशाच्या लोकशाहीचा 'DNA' सुरक्षित राखण्याकामी मछऊअ'ला का गाडायचं आणि ''INDIA-आघाडी'ला का निवडायचं... ''इंडिया, एक आयडिया'', मालिकेतील

**लेख-अनुक्रमांक १**

गौतम बुद्धाकडे एकदा एक माणूस आपल्या समस्यांची जंत्री मांडू लागला. त्याच म्हणणं शांतपणे ऐकून घेतल्यानंतर गौतम बुद्ध म्हणाले, ''तू मांडलेल्या ८३ समस्या सोडविण्यास मी 'असमर्थ' आहे...पण, त्यातली शेवटची ८४वी समस्या मात्र, मी नक्कीच सोडवू शकतो आणि ती सोडवली की, तुझ्या बाकी समस्या सुटण्याचा मार्ग तुला सापडेल. तिचं तुझ्या सगळ्या समस्यांची 'गुरुकिल्ली' आहे...'तुझ्या आयुष्यात, त्या ८३पैकी कुठलीही समस्या असणंच तुला नको आहे', हीच तुझी ८४वी समस्या आहे. ही तुझी वांछा, जी तुझ्या नियंत्रणात आहे, तिचं तू त्यागलीस की, तुझ्या अगोदरच्या ८३ समस्या हळूहळू सुटू लागतील. आपल्या नियंत्रणात असलेल्या समस्या आपण सोडवल्या; तरच, मृत्यू, आजार, निसर्गाची अवकृपा, लोकांच्या टीका...यासारख्या, आपल्या नियंत्रणाबाहेर असलेल्या समस्यांवरचा मार्ग सापडतो; अन्यथा, नव्हे!''

तेव्हा मतदारराजा, लोकसभा-निवडणुकीत जागरुकतेनं मतदान करणं...एवढंच, सद्यस्थितीत तुझ्या नियंत्रणात आहे. देशात अक्राळविक्राळ पसरलेल्या हुकूमशाहीचा नंगानाच, सरकारी-यंत्रणांची बेलगाम दहशत, पुढल्या पिढ्यांचं धोक्यात आलेलं भविष्य, अमानुष आर्थिक-विषमता, महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी-अर्धरोजगारी, तथाकथित विकास वगैरे समस्यांच्या सोडवणुकीची, तिचं 'गुरुकिल्ली' आहे!

जागरुकतेनं मतदान करणं म्हणजे, देशापुढची सगळ्यात मोठी व मूलभूत समस्या जाणून घेणं आणि नेमकी ती कोणामुळे निर्माण झालीय व ती समस्या नक्की कोण सोडवू शकेल, याचं नीट आकलन होणं होय.

आर्थिक-विषमता, महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी-अर्धरोजगारी, विकास वगैरे समस्या पूर्वीही होत्या आणि याहीपुढे थोड्याफार प्रमाणात त्या राहतीलच...पण, देशापुढची सध्याची सगळ्यात मोठी व पिढ्यापिढ्यांचं भयंकर नुकसान करु शकणारी, अशी समस्या कुठली असेल; तर ती, देशात भाजपाई-संघीय नरेंद्र मोदी सरकारने लादलेली 'अघोषित आणीबाणी', ही होय!

---

**देशाच्या लोकशाहीचा 'DNA' सुरक्षित राखण्याकामी 'NDA'ला का गाडायचं आणि 'INDIA-आघाडी'ला का निवडायचं... ''इंडिया, एक आयडिया'', मालिकेतील लेख-अनुक्रमांक २**

निवडणूक आयोग, न्यायालयं, विद्यापीठं, नीतिआयोग, कॅग, ईडी-आयटी-सीबीआय सारख्या सगळ्याच केंद्रीय अथवा स्वायत्त-यंत्रणा वेड्यावाकड्या ताब्यात घेऊन, EVM चा कथित गैरवापर करुन, 'इलेक्टोरल-बॉण्ड'सारख्या सरकारी-दरोडेखोरीच्या माध्यमातून प्राप्त हजारो कोटींच्या काळ्या पैशातून प्रचंड महागडा असा 'आयटी-सेल' चालवून; तसेच, शिक्षित-अशिक्षित 'अंधभक्तां'च्या फौजेला सोबत ठेऊन आणि दमनकारी पोलिस-यंत्रणेकरवी 'बुलडोझर-रिपब्लिक' चालवून... भाजपाई मोदी-शाह सरकार हुकूमशाहीचा जो वरवंटा फिरवतेय...ती अघोषित आणीबाणी आहे; पण, ती १९७५च्या इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीपेक्षा भयंकर आहे!

१९४७ सालचं पहिलं स्वातंत्र्ययुद्ध आपण जिंकलो, ते लाल-बाल-पाल, म. गांधी, पं. नेहरु, सुभाषचंद्र बोस, मौलाना अबुल कलाम आझाद यासारख्या महान पुढाऱ्यांच्या नेतृत्त्वाखाली व भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, मंगल पांडे, अशफाक उल्ला खान, शिरीषकुमार, बाबू गेनू यासारख्या शेकडो स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानातून!

**दुसरं स्वातंत्र्ययुद्ध आपण १९७७ साली, इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीविरुद्ध, उर्वरित सगळ्या पक्षांची जनतादलाच्या रुपाने मोट बांधून, त्यांचा लोकसभा-निवडणुकीत पाडाव करत जिंकलो आणि आता त्यानंतर, बरोबर ४७ वर्षांनंतर हे 'तिसरं स्वातंत्र्ययुद्ध' आपण लढतो आहोत आणि काळाचा महिमा बघा, ते तिसरं स्वातंत्र्ययुद्धही, १९७७ प्रमाणेच देशभरातले सगळे विरोधीपक्ष, सत्ताधारी भाजपाविरुद्ध 'इंडिया-आघाडी'च्या बिरुदाखाली एकत्र येऊनच लढतो आहोत!**

**१९७५ची आणीबाणी, कायदेशीर मार्गाने आली आणि कायदेशीर मार्गानेच गेली. पण, ही अघोषित–आणीबाणी बेकायदेशीर आणि घटनाद्रोह करणारी आहे, कितीतरी अधिक घातकी आहे...त्यावेळी, इंदिरा–सरकारने ईडी/आयटी/सीबीआयच्या विरोधकांवर सर्रास धाडी नव्हत्या घातल्या आणि काही विरोधकांना तुरुंगात धाडण्यामागे कायदा–सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून काहीप्रमाणात योग्य कारणंदेखील होती व एकदा १९७७ साली निवडणुका जाहीर झाल्यानंतर इंदिरा गांधींनी सगळ्याच विरोधकांना निवडणूक लढविण्यासाठी पूर्ण मोकळीक दिली होती... कुणालाही तुरुंगात ठेवलं नव्हतं, विरोधी पक्षांची बँक–खाती गोठवली नव्हती आणि आज काय हुकूमशाहीचा भयंकर तमाशा चाललाय देशात?**

'बोलता हिंदुस्तान' हे प्रख्यात युट्यूब-चॅनेल सूचना न देता रातोरात बंद करण्यात आलंय आणि सरकारविरोधात 'अबोल' असणारा 'गोदी-मिडीया' मात्र, सरकारी-जाहिरातींच्या शेकडो-हजारो कोटीत खेळतोय! ही घटनात्मक मूलभूत अधिकार असलेल्या 'भाषण व विचार स्वातंत्र्या'ची मुस्कटदाबी आहे, गळचेपी आहे...'लोकशाहीचा चौथास्तंभ' असलेल्या पत्रकारितेला जबरदस्तीने मूठमाती देऊ पहाणं आहे. सरकारची 'री' ओढणाऱ्या, सरकारविरुद्ध अजिबात न बोलणाऱ्या 'गोदी-मिडीया'सकट सगळ्यांनाच हा दिल्लीश्वर-हुकूम'शहां'चा घातकी इशारा आहे! लक्षात घ्या, भाजपाई मोदी-शाह रासवट राजवटीत 'Freedom of Speech' जवळपास गेलंय आणि 'Freedom to Rich' मुक्तहस्ते आलंय, ते मिळालंय 'अंबानी-अदानी'सारख्या मोदीजींच्या शे-दिडशे गुजराथी-भाषिक मित्रपरिवारातल्या (Crony-Capitalists) भांडवलदारवर्गाला...लुटा देशाला, लुटा जनतेला हवं तेवढं... ''मोजक्या लोकांच्याच हातात सत्ता-संपत्ती ठेवायची, वर्णवर्चस्ववादी-शोषक मानसिकता त्यामागे आहे''! देश पूर्ण लुटून खाल्ला; तरीही, या 'गुजराथी-लॉबी'ला लागलेला 'भस्म्यारोग' बरा होणं शक्य नाही... तेव्हा, सावधान!

---

**देशाच्या लोकशाहीचा 'DNA' सुरक्षित राखण्याकामी 'NDA'ला का गाडायचं आणि 'INDIA–आघाडी'ला का निवडायचं... ''इंडिया, एक आयडिया'', मालिकेतील लेख–अनुक्रमांक ३**

## 'मदर ऑफ डेमॉक्रसी' ते 'मर्डर ऑफ डेमॉक्रसी...

''तमसो मा ज्योतिर्गमय'' असा आपल्या भारतीय-आध्यात्मिक अंतःप्रज्ञेचा मोक्षाप्रत नेणारा ऊर्ध्वप्रवास... तर, भाजपाई बनावट-बेगडी 'हिंदुत्वा'चा प्रवास उलटा किंवा अधोगामी : 'प्रकाशाकडून अंधाराकडे' नेणारा...!!!

...सापाच्या विषासारखी या 'अघोषित आणीबाणी'तली हुकूमशाही, गुलामगिरी (जशी ती, 'गोदी-मिडीया'तल्या गलेलठ्ठ पगाराच्या अँकर्स, मालक-संपादक व इतर पत्रकारांच्या रक्तात उतरलीय); तुमच्याआमच्या अंगात-रक्तात हळूहळू खोलवर भिनू पहातेय... तेव्हा, सावध होऊन काळाच्या हाका ऐका!

तुमच्या मातीत घट्ट रुजू पहात असलेली ही विषवल्ली जर, २०२४च्या लोकसभा-निवडणुकीत शेतातलं तण उपटून फेकून द्यावं, तशी... आपण मतपेटीतून उपटून फेकून दिली नाही; तर, मतदारराजा, तुझं 'लोकशाहीचं पीक' हातचं गेलं म्हणून समज! हे 'हुकूमशाही'चं तण...तुमचंआमचं जीणं हराम करेल, जगणं मुश्किल करेल...आणि, त्याविरुद्ध, कोणी साधा आवाजसुद्धा उठवू शकणार नाही!

...आज लोकशाहीचा आवाज जिवंत ठेवण्यासाठी धडपडणाऱ्या विरोधकांना फक्त, तुरुंगातच डांबलं जातंय, उद्या रशियातला पुतीन करतो तसं, विरोधकांना तुरुंगात डांबून विष चारुन मारणं, किती दूर आहे?...कारण ते क्रौर्य, ती हुकूमशाही-जुलूमशाही प्रवृत्ती, या लोकांनी काळ्या टोपीसह इटलीचा नृशंस हुकूमशहा मुसोलिनीकडून उसनी घेतलीय.

...लक्षात ठेवा की, रावण प्रत्येकवेळी साधुचा वेष धारण करुनच सीतेचं अपहरण करतो, असं नव्हे; तो कधि कधि खुद्द रामाचाच वेष परिधान करुन येतो.

...भाजपा नावाचा 'रावण', 'सब का साथ, सब का विकास' पुटपुटत, विकासाचं सोंग घेऊन २०१४मध्ये प्रथम आला, २०१९मध्ये तो बालासोर 'सर्जिकल-स्ट्राईक'च्या रुपाने 'देशभक्ति'चं सोंग वठवत आला आणि आता २०२४मध्ये, अयोध्येतल्या राममंदिराच्या निमित्ताने रामभक्तिचं 'दशावतारी-सोंग' वठवत परत आलाय... आपण, गेल्या दोन्ही खेपेस फसलो. आपल्या देशातल्या 'लोकशाहीरुपी सीतेचं अपहरण करुन, तो आज इथेच ठिय्या देऊन बसलाय (लंकेत परत जायची सोय नाहीच; 'कच्चाथिवू' बेटावरुन लंकेशी हकनाक दुश्मनी घेऊन बसलेत ना).

...आज लोकशाहीचा आवाज जिवंत ठेवण्यासाठी धडपडणाऱ्या विरोधकांना फक्त, तुरुंगातच डांबलं जातंय, उद्या रशियातला पुतीन करतो तसं, विरोधकांना तुरुंगात डांबून विष चारुन मारणं, किती दूर आहे?...कारण ते क्रौर्य, ती हुकूमशाही-जुलूमशाही प्रवृत्ती, या लोकांनी काळ्या टोपीसह इटलीचा नृशंस हुकूमशहा मुसोलिनीकडून उसनी घेतलीय.
...लक्षात ठेवा की, रावण प्रत्येकवेळी साधुचा वेष धारण करुनच सीतेचं अपहरण करतो, असं नव्हे; तो कधि कधि खुद्द रामाचाच वेष परिधान करुन येतो.

या लोकसभा-निवडणुकीनंतर आपल्या देशात निवडणुका होणारच नाहीत, असं नाही...त्या होतील; पण, त्या कशा होतील...तर जशा त्या चीन, उ. कोरिया व रशियामध्ये होतात, तशाच होतील. तिथल्या निवडणुकांमध्ये 'लोकेच्छा' नव्हे; तर, राज्यकर्त्यांची सत्तापिपासू 'पाशवी इच्छा' प्रतिबिंबित झालेली असते.

...नाहीतरी, ब्लादिमीर पुतिनसारखाच क्रूर, विकृत मनोवृत्तीचा रशियाचा भूतपूर्व अध्यक्ष जोसेफ स्टॅलिन म्हणायचा की, ''निवडणुकीत 'मतदार' महत्त्वाचे नसून 'मत मोजणारे' महत्त्वाचे असतात'' (आपल्याकडे, एतची, निवडणूक-आयोग आणि ईडी/आयटी/सीबीआयसारख्या दमनकारी सरकारी-यंत्रणा महत्त्वाच्या असतात). अशाच हडेलहप्पीने व दडपशाहीनेच तर, पुतिन आजवर बेगुमानपणे निवडणुका जिंकत आलेत. आपली सत्ता तहहयात कायम राखण्यासाठी राज्यघटनेत वेडेवाकडे बदल करत आलेत, विरोधकांना सरळ ठार मारत किंवा त्यांच्यावर विषप्रयोग करत आलेले आहेत...हाच, (रास)पुतीन नावाचा सत्तापिपासू फुगा, आपल्यासाठी 'धोक्याचा कंदील' बनून लोकसभा-निवडणुकीच्या तप्त हवेत वर लटकतो आहे...आपली नजर, किमान वर तर जायला हवी ना!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

*(क्रमशः)*

---

**एकीकडे 'जागतिक तापमानवाढी'तून निसर्गतः आपसूकच (वादळवाऱ्यामुळे होणाऱ्या झाडांच्या फांद्यांच्या घर्षणामुळे; तसेच, पालापाचोळ्यासह जनावरांच्या विष्ठेसारख्या कुजणाऱ्या सेंद्रिय–पदार्थांतून निर्माण होणारी अतिरिक्त उष्णता व त्यातून बाहेर पडणाऱ्या मिथेनसारख्या ज्वलनशील वायुंमुळे) जंगलांमधून लागणाऱ्या आगींचं–वणव्यांचं तांडवनृत्य वाढत चाललेलं असतानाच...नीच–नराधमवृत्तीच्या माणसांकडून, विघ्नसंतोषी–विकृत आनंद मिळवण्यासाठी, माळरानात–जंगलात आगी लावण्याचं प्रमाण बेसुमार वाढत चाललंय. कधि बेकायदेशीररित्या केली जाणारी जंगली प्राण्यांची शिकार सुलभ व्हावी; म्हणून, तर कधि मोहासारख्या काही विशिष्ट वनस्पतींच्या झाडांची 'पांढरी' फुलं, 'काळ्या राखे'च्या पृष्ठभूमीवर वेचणं (ज्यातून, मोहाची गावठी दारु किंवा काही खाद्यपदार्थ तयार केले जातात) सुलभ व्हावं म्हणून, जाणिवपूर्वक आगी स्थानिकांकडून लावल्या जातात...** तर, कधि मेळघाटासारख्या जैवसंपन्न परिसरात केवळ, आगीची झळ पोहोचलेल्या तेंदुपत्याच्या वनस्पतींना पुढील वर्षी 'मोठी पानं' (विडी वळण्यासाठी लागणारी) येऊन तेंदुपत्याला अधिकचा भाव मिळतो म्हणून...अत्यंत क्षुद्र स्वार्थांपोटी जंगलात वणवे लावले जातात.

**...सर्वार्थाने, 'माणूस' हाच, त्याच्या बेसुमार संख्येमुळे 'पृथ्वी' या ब्रह्मांडातील एकमेवज्ञात 'सजीव–गोळ्या'साठी, एक भयंकर 'उपद्रवी–जीव' (जसे, माणसाला 'करोना'सारखे सगळेच रोगकारक बॅक्टेरिया–विषाणू–बुरशी वगैरे उपद्रवी वाटतात) ठरलाय...**'सुर्याचा स्थिरांक' (Solar-Constant) या संकल्पनेनुसार संपूर्ण पृथ्वीवर जास्तीतजास्त २०० ते २५० कोटी, एवढीच माणसांची संख्या अवघ्या जैवशृंखलेच्या दृष्टीकोनातून योग्य असताना... आपण, आठशे कोटींचा पल्ला गाठलाय, या दुर्दैवी-भयावह स्थितीला काय म्हणावं? ...त्यातून आधुनिक जीवनशैली, आधुनिक शेती, आधुनिक अर्थव्यवस्था आणि आधुनिक विकासाचं प्रारुप...या सगळ्याच 'कार्बनकेंद्री' व इतर प्रदूषणकारी बाबींमधून आपण पृथ्वीमातेवरील सजीवसृष्टीचं आवरण व सहजीवन उध्वस्त करत सुटलोत; ज्याचे विध्वंसक परिणाम, आपल्यासह आपल्या पुढील पिढ्यांना भोगावे लागणार आहेतच!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'... The First 'Green-Political Party' Of India)

# पृथ्वीवरचं जीवन वाचवण्यासाठी 'शेवटच्या संधि'च्या रुपाने येताहेत पुढील दोन वर्षे

...सिमॉन स्टिएल (युनोचे हवामानबदल-समितीचे प्रमुख)

निवडणुकीच्या रणधुमाळीत, आपल्यासह अवघ्या सजीवसृष्टीच्या अस्तित्वाच्या आसाला भिडलेला हा क्षीण स्वर, ऐकू येतोय का आपल्याला, जरा पहा...!!!

जागतिक अर्थमंचाच्या (WEF) व्यासपीठावर वर्चस्व गाजवणारी G-20 राष्ट्रे (ज्याची, १८ वी परिषद गेल्यावर्षी ९-१० सप्टेंबर रोजी दिल्लीत मोठ्या दिमाखात भरवली गेली होती)...ही, जगातील ८०% 'कार्बन-उत्सर्जना'स जबाबदार असून, तथाकथित 'विकासा'च्या नावाखाली पृथ्वीमातेवरील जीवन नष्ट होण्यासंदर्भात 'खलनायकी' भूमिका बजावत आहेत...असं, अत्यंत रोखठोक व गंभीर प्रतिपादन, संयुक्त राष्ट्र संघाच्या (UNO) हवामानबदलविषयक समितीचे कार्यकारी सचिव श्री. सिमॉन स्टिएल यांनी नुकतंच केलंय.

**वर्ष-२०३० पर्यंत जागतिक 'कार्बन-ऊत्सर्जन' निम्म्याहून खाली आणून जागतिक-तापमानवाढ, औद्योगिक-क्रांतिपूर्व काळाच्या तुलनेत जास्तीतजास्त १.५ओसें.ग्रे. पर्यंत मर्यादित राखण्याकामी योगदान देण्याऐवजी...या G20 राष्ट्रांनी अत्यंत बेजबाबदारपणे, गेल्यावर्षी कार्बन-ऊत्सर्जन कमी करण्याऐवजी वाढवलेलं आहे...अशी त्यांनी अत्यंत धक्कादायक सप्रमाण मांडणी केलीय.**

**जगभरातील युद्धजन्यस्थिती व 'भांडवली-व्यवस्थे'तील 'कार्बनकेंद्री-विकासा'चं मानवजातीला जडलेलं घातकी व्यसन...या दुहेरी पेचामुळे, राजकारण्यांच्या विषयपत्रिकेतून 'निसर्ग-पर्यावरण संरक्षण-संवर्धना'चा मुद्दा जणू बाजुला पडल्यासारखा झालाय. त्यामुळे, एकूणच हा विषय, सकल मानवजातीच्या हातातून निसटून, त्याचे दोर निसर्ग, अत्यंत प्रलयंकारी स्वरुपात आपल्या हाती घेईल... ही भयंकर दुश्चिन्हं यापूर्वीच दिसू लागलीयत.**

या पर्यावरणविषयक गंभीर इशाऱ्याने, आपल्याकडच्या लोकसभा-निवडणुकीच्या कॅन्व्हासवर... मोदी-शाह, नितीन गडकरींसारख्या भाजपाई मंडळींचा उदोउदो करणाऱ्या 'अंधभक्तां'च्या आतातरी ध्यानी आलं पाहिजे की, हे सगळेच 'विकासपुरुष' वगैरे नसून 'विकारपुरुष' आहेत. यांनी, आपल्या भांडवलदार-मित्रांना (Crony-Capitalists) लाखो कोटी नफा सहजी गिळंकृत करता यावा म्हणून, कॉंक्रिटचा कार्बनकेंद्री 'भांडवली-विकार', या देशात फैलावून दिलाय...तो देशासाठी आर्थिकदृष्ट्या तर घातकी होताच; पण, त्याचे भविष्यकालीन 'पर्यावरणीय-आयाम'ही विध्वंसक आहेत. त्यामुळेच, आता या सगळ्या



तथाकथित विकासाच्या राजकारणाचं सत्य-कठोर मूल्यमापन, वरील संदर्भात होणं, नितांत गरजेचं आहे...कारण, यातून अतिरेकी कार्बन-ऊत्सर्जनासोबतच छत्तीसगडचं हसदेव, मुंबईचं आरे कॉलनी, अंदमानचं ग्रेट-निकोबार वगैरे मधील, मोठ्याप्रमाणावर 'कर्बग्रहण' करणारी जंगलं तुटणार आहेत...शेकडो वर्षांचे लाखो महाकाय वृक्ष क्रूरपणे कापले जाणार आहेत किंवा याआगोदरच कापले गेले आहेत.

यातून, या भाजपाई सत्ताधाऱ्यांचा चारही बाजुंनी फायदा (चारों उंगलियाँ घी में) असा की, तथाकथित विकासाच्या नावाखाली अज्ञानी जनतेची व चंगळवादाला सोकावलेल्या मध्यमवर्गीयांची मतं तर मिळतातच... शिवाय, असा लाखो कोटींचा चुराडा करण्यासाठी, अगदी ५० वर्षांएवढ्या अतिप्रदीर्घ काळासाठीचीही कर्ज काढली गेलीयत (कॉंग्रेसच्या ७० वर्षांच्या कारकीर्दीत अशा प्रकारचं भयंकर आक्रित, अपवादात्मक परिस्थितीतही कधि घडलं नव्हंत), ज्यांची 'परतफेड' पुढील पिढ्यांना व पुढील सरकारांना करावी लागणार आहे. पण, या प्रकल्पांमधल्या अतिप्रचंड नफ्याचे, तर हे सगळेच भाजपाई-संघीय लोकं आजचं भागिदार असतीलच (उदा. छुपी टक्केवारी व इलेक्टोरल-बॉण्डस वगैरेंमधून निवडणुका जिंकण्यासाठी); शिवाय, महामार्गांच्या व नदी-खाडीवरील पुलांच्या; तसेच, रस्त्यांवरील उड्डाणपुलांच्या 'टोल-वसुली'च्या सरकारी-दरोडेखोरीतून अफाट-अचाट महसुलाची प्राप्तीदेखील त्यांना तत्काळ होत राहील, ते वेगळंच!

**म्हणूनच, नरेंद्र मोदींच्या भाजपा-सरकारने लादलेल्या 'अघोषित-आणीबाणी'तील हुकूमशाहीविरुद्ध प्रामुख्याने, आपण या लोकसभा-निवडणुकीच्या रुपाने लढा देत असताना, या आपल्या तिसऱ्या स्वातंत्र्ययुद्धात (पहिलं ब्रिटिशांविरुद्धचं १९४७ सालचं, दुसरं १९७७च्या घोषित आणीबाणीविरुद्धचं व तिसरं आताच्या 'अघोषित' पण, अतिगंभीर स्वरुपाच्या आणीबाणीतील हुकूमशाहीविरुद्ध), कुठल्याही परिस्थितीत विजयी होण्यासाठी...वरील मुद्देही, प्रकर्षाने व अत्यंत गंभीरपणे भारतीय-मतदारांच्या (विशेषतः, महाराष्ट्रातील मराठी मतदारांच्या) आपण निर्दशनास आणले पाहिजेत...धन्यवाद!**

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...The First 'Green-Political Party' Of India)

---





*'धर्मराज्य पक्षा'चे, ३३-मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार, महेश ठाकूर यांच्या प्रचारार्थ, दि. २८ एप्रिल-२०२४ रोजी, पनवेल तालुक्यातील कामोठे येथील, आगरी समाज सभागृह येथे, पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा मेळावा संपन्न झाला. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे संस्थापक/अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित राहून पदाधिकारी/कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. 'धर्मराज्य पक्षा'चे उमेदवार महेश ठाकूर यांचा विजय हा, मावळ लोकसभा मतदारसंघातील कामगार-कर्मचारी-कष्टकरी आणि शेतकऱ्यांच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, रक्तपिपासू-निर्मम-शोषक 'भांडवली व्यवस्था' मोडीत काढण्यासाठी, मावळचा मावळा असणाऱ्या महेश ठाकूर यांना, प्रचंड मतांनी विजयी करणे हे, फक्त 'धर्मराज्य पक्षा'च्या कार्यकर्त्यांचेच नव्हे; तर, समस्त सर्वसामान्य मराठी भूमिपुत्र नागरिकाचे आद्य-कर्तव्य असल्याचे स्पष्ट प्रतिपादन मा. राजन राजे यांनी यावेळी बोलताना केले. दरम्यान, याप्रसंगी पक्षाचे सह-सचिव नरेंद्र पंडित यांनी प्रचाराची रुपरेषा उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सांगितली. या मेळाव्याला 'धर्मराज्य पक्षा'चे सचिव अजित सावंत, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष गोपीनाथ भगत, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा-टॅक्सी चालक, मालक संघटने'चे अध्यक्ष श्री. राजू म्हात्रे, पक्षाच्या कामोठे विभाग महिला अध्यक्षा सौ. प्राजक्ता गोवारी, रिक्षा संघटनेचे कामोठे विभाग सचिव महेंद्र म्हात्रे, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर, उपाध्यक्ष श्री. सचिन शेट्टी, महाराष्ट्र राज्य महिला समन्वयक सौ. रेश्मा पवार या पदाधिकाऱ्यांसह, पनवेल तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते.*

# उत्तरेत हाफ आणि दक्षिणेत साफ

उत्तरेत हाफ आणि दक्षिणेत साफ अशा, २०२४च्या लोकसभा-निवडणुकीच्या पहिल्याच चरणात दिसायला लागलेल्या सुस्पष्ट संकेतांनंतर...गुजराथी पंतप्रधानांना भयंकर मिरची झोंबलीय आणि ते, पंतप्रधानपदाची इभ्रत तर सोडाच; पण सामान्य भारतीय-नागरिक म्हणूनही जो काही आब, जी काही मानमर्यादा असते... ते सगळं सोडून, कालचं काँग्रेसचं मनमोहनसिंग सरकार व आजचं काँग्रेसचं न्यायपत्र...यासंदर्भात, पं. नरेंद्र मोदी, वाटेल ते खोटंनाटं व देशात दंगलप्रवण वातावरण निर्माण होऊ शकेल... अशा धोकादायक पद्धतीने बरळायला लागलेत...सत्तेच्या लालसेपोटी आणि राज्यात व केंद्रात सत्तेवर असताना केलेल्या कुकर्मांची फळं भोगायला लागण्याच्या साद्यंत भितीपोटी, पंतप्रधानांनी केलेली ती बेजबाबदार विधानं, इथे आम्ही पुन्हा बिलकूल उद्धृत करु इच्छित नाही आणि कोणीही ती करु नयेत; एवढी, ती कमालीची आक्षेपार्ह आहेत. त्याबाबत, पंतप्रधानांवर खझउ १५३ अंतर्गत ३ वर्षांच्या तुरुंगवासाची सजा होऊ शकणारा गुन्हा दाखल व्हायलाच हवा, अशी 'धर्मराज्य पक्षा'ची ठाम मागणी आहे. 'Rule of law' आणि 'Equality before the law'...या घटनात्मक सूत्रांनुसार व तरतुदींनुसार, या वाक्ताडनावर गंभीर स्वरुपाची कारवाई, ही तत्काळ व्हायलाच हवी!

**...फक्त, १% असलेल्या, प्रामुख्याने धनदांडग्या-माजोर्‍या गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाने, आजवर संघटितपणे व संगनमताने स्वत:कडे गोळा केलेली देशाची ४०% साधनसंपत्ती, भारतीय-जनतेच्या डोळ्यात, खूप उशिरा का होईना, आता चांगलीच खुपायला लागलीय... हे चांगलं लक्षण आहे. त्यातूनच, या रक्तपिपासू-निर्मम-शोषक 'भांडवली-व्यवस्थे'ला (Vampire-State System) घरघर लावण्याचा कायदेशीर मार्ग, भारतीय जनतेला खात्रीने सापडेल!**




हिंदू धर्माने अथवा भारतीय अध्यात्माने लक्ष्मीला 'देवत्व' बहाल जरुर केलंय; पण, त्याचबरोबर, समाजाच्या सर्वांगीण व सर्वंकष उत्कर्षासाठी 'त्येन त्यक्तेन भुंजिथा' किंवा 'त्यागातून भोग वा भोगातून त्याग' हे मार्गदर्शक सूत्रही घालून दिलेलं आहे व तो आपद्धर्म म्हणून सक्तिने पाळायला सांगितलेला आहे.

भाजपाच्या बेगडी-बनावट हिंदुत्वात, फक्त 'देव देव' करणं, देवळं बांधणं, आरत्या ओवाळणं... हेच केवळ, 'हिंदुत्व' म्हणून गणलं जातं असावं. बर्‍याचदा, हे जे जास्त 'देव देव' करणारे असतात ना... तेच व्यवहारात लुटालुटीची 'देवघेव' करणारे असतात!

'भांडवली-व्यवस्थेच्या राक्षसी बळावर, सुसंघटितपणे उर्वरित समाजाची संपत्ती ओरबाडून आपल्याकडे व आपल्या जमातीकडे अन्यायकारकरित्या केंद्रित, संग्रहित करणं... याला 'हिंदुत्व' म्हणायचं? जातिवंत हिंदुत्वात, संपत्तीचा 'अतिसंचय' झाला की, वेळोवेळी आपली संपूर्ण संपत्ती गोरगरीब-गरजूंना दान करणं (निदानपक्षी, मोठ्या प्रमाणावर दान करणं) अभिप्रेत असतं.

**कुणीही कुणाचं तरी, खूप काही लुटल्याखेरीज, ओरबाडल्याखेरीज... कुणाकुणाचंच नव्हे; तर, अवघ्या समाजाचं खूप काही देणं नाकारल्याखेरीज आणि निसर्ग-पर्यावरणावर मोठे अत्याचार केल्याखेरीज 'अतिश्रीमंत' (Blood Billioners) होऊच शकत नाही!**

...या सगळ्याचा साकल्याने विचार करता, नरेंद्र मोदी आणि त्यांचे 'अंधभक्त' हे हिंदुधर्माला लांछन आहेत, भारतीय-अध्यात्माला लागलेला काळिमा आहे हा... ते लांछन, तो काळिमा...२०२४च्या लोकसभा-निवडणुकीत 'इंडिया-आघाडी'ला भरघोस मतदान करत, राजकारणातून साफ मिटवून टाकलाच पाहिजे...जय हो!


***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## एकदा नक्कीच वाचा, विचार करा आणि निर्णय घ्या

*टेस्टिंग, सँपल आणि ट्रेलर*
*काजू कतली घेताना हलवाई छोटा तुकडा चाखायला देतो.*
*तो आपण टेस्ट करतो.*
*लग्नाच्या जेवणाचा कॅटरर आपल्याला टेस्टिंगसाठी बोलवतो.*
*आपण त्याचं जेवण सहकुटुंब टेस्ट करतो.*
*डॉक्टरांना औषधं सांगताना*
*मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह सँपल देतो.*
*डॉक्टर ती औषधं पेशंटना फुकट देतात.*
*काजू कतलीचा तुकडा , लग्नाचं टेस्टिंग आपल्याला खरी चव दाखवतात.*
*नामवंत लेखकाच्या पुस्तक प्रकाशना आधी त्याचं परीक्षण पेपरात छापून येतं.*
*वाचकांना पुस्तकाचा अंदाज येतो.*
*करोडो रुपये खर्चून बनवलेला तीन तासांचा चित्रपट डायरेक्ट प्रदर्शित होत नाही.*
*त्या चित्रपटातील महत्त्वाची दृश्य जोडून एक ते तीन मिनिटांची क्लिप बनवतात.*
*त्याला चित्रपटाचा ट्रेलर म्हणतात.*
*ट्रेलर बघून रसिक चित्रपटाचा अंदाज घेतात.*
*साहेब म्हणतात : गेल्या दहा वर्षे हा ट्रेलर होता.*
*खरा पिक्चर अजून बाकी आहे !!*
*आता काय जीव घेणार का आमचा ??*
*सगळं काही बदलून झालंय.*
*झेंडा आणि राष्ट्रगीत बदलायचं बाकी आहे*
*कठोर असणं आणि गेंड्याच्या कातडीचं असणं यात फरक आहे !!*
*काळा पैसा*
*१५ लाख*
*२ कोटी नोकऱ्या*
*१०० स्मार्ट सिटी*
*ही सगळी फ्री सँपल वाटून झाली !!*
*लोकांना भुकेने मरायची वेळ आणलीत !!*
*दहा वर्षांचा ट्रेलर बघून थरकाप होतोय !!*
*आता तुम्ही झोला उचलून विश्रांती घ्या !!*

*तळटीप :*
*मासा पकडायला लावलेला गळ हे पण फ्री सँपलच असतं.*
*आम्ही मासे नाहीत*
*विचारी नागरिक आहोत !!*

*सखोल तळटीप :*
*जियो ने वाटलेली फुकट सिम कार्ड आणि फुकट डेटा पण गळच होता !!*
*एकदा फसलो, दुसऱ्यांदा फसलो आता नाही बरं का*
***- उषा***


Rajan Raje - राजन राजे ... · 19s
हिसाब 1974 साल का 285 एकड वाले, 'कचाथीवू' द्वीप का माँगते हो...तो हम तुमसे बांगलादेश को 2015 में भारत की ओर से, अतिरिक्त दान दिये गये, करीबन 10,000 एकड का और चीनने कब्जा किये हमारे गलवान-घाटी के 4000 स्वे.कि.मी. का हिसाब माँग रहे है...है कोई जवाब?
@RahulGandhi
@uddhavthackeray


*३३-मावळ लोकसभा मतदार संघातून 'धर्मराज्य पक्षा'तर्फे उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी महेश ठाकूर यांनी मारुतीरायाचे दर्शन घेतले.*

# (ध्रुव राठीच्या, ताज्या व्हिडीओच्या पार्श्वभूमीवर, वाचकांच्या माहितीसाठी १८ ऑक्टोबर–२०१८चा 'धर्मराज्य–संदेश' पाठवीत आहोत....)

**'संत निगमानंदजीं' पाठोपाठ, 'संत ज्ञानस्वरुप सानंद' यांनी 'गंगामैय्ये'च्या रक्षणासाठी नुकतीच प्राणांची आहुती दिली... त्यानंतर, 'संत गोपालदास', (वय वर्ष अवघं ३६ वर्षे) ऐन तारुण्यात गंगामातेसाठी प्राण अर्पण करायला सिद्ध झालेत... त्यांची दिव्य–तेजस्वी प्राणज्योत मालवायला, आता काळाच्या फक्त एका हलक्या फुंकरीची गरज तेवढीच उरलीय... ती ही 'गरज', येत्या काही दिवसात, या देशातल्या रक्त–पिपासू शोषक व्यवस्थेकडून (**Vampire State System**) आणि डोळ्यावर कातडं ओढून, कानात बोळे घालून बसलेल्या..... या देशातल्या, 'जातधर्मा'त आणि 'चंगळवादी–जीवनशैली'त अडकून पडलेल्या, स्वार्थी–बेजबाबदार भारतीय जनतेकडून भागवली जाईलच !!!**




२४ जून–२०१८ पासून उपोषणाला बसलेल्या 'संत गोपालदासां'ना या आठवड्यात दोनचार दिवसांच्या अंतराने, दुसऱ्यांदा एम्स (IIMS) इस्पितळात हलविण्यात आलेलं आहे. गेले काही दिवस, गंगेच्या रक्षणासाठी सर्व उपाय थकल्यावर, अखेरीस परमेश्वरालाच साकडं घालण्यासाठी, पाण्याचाही त्याग करत, अनंताचा प्रवास करायला 'संत गोपालदास' सिद्ध झालेत!

त्यापाठोपाठ, 'संत शिवदासजी' आणि त्यानंतर, भरतभूमितल्या अशा अनेक जातिवंत आणि जाज्वल्य संतांनी प्राणार्पण करण्याची तयारी केलीय. परिस्थिती एवढी गंभीर आहे की, कधिकाळी भूलोकीची पवित्रभूमि मानल्या गेलेल्या या भरतभूमिला, या संतांच्या अतिशय 'पावन–पवित्र रक्ता'चीच जणू तहान लागलीय, असं विदारक चित्र या देशात निर्माण झालेलं दिसतंय.... नेमके आपण, कुठल्या दर्जाचे आणि लायकीचे 'नागरिक' आहोत? **आपण, नक्की 'नागरिक'च आहोत (कारण, 'नागरिक' या संकल्पनेत, काही किमान पातळीवरची संवेदना आणि सुसंस्कृतता गृहित धरलेली असते) की, 'जातधर्मा'च्या नांवाने शिमगा करत इतरांचं व निसर्गाचं शक्य होईल तेवढं, जळवेसारखं आकंठ–निर्मम शोषण करत जगणाऱ्या 'रानटी जमाती' आहोत?? अहो, रानटी जमातीसुद्धा आपल्यापेक्षा एका बाबतीत अधिक भल्या व सुसंस्कृत म्हणायला हव्यात. त्या जमाती, ज्याच्या जीवावर आपण जगतो, त्या निसर्गाला पूजतात... मग, त्याच्या मुळावर उठण्याची गोष्ट त्यांच्या हातून कालत्रयी घडू शकेल? काल–परवापर्यंतची आपली मराठी–संस्कृतीही अशीच 'निसर्गपूजक' होती.... पण, 'विकासा'चं व्यसन जडलं आणि इतरांचं अंधानुकरण करत मौजमस्तीच्या नादात आम्हीही पुरते बिघडलो.... आमच्याच अस्तित्वाच्या मुळावर उठलो! आधुनिकतेचे आणि बुद्धीवादाचे दांभिक व आपमतलबी मुखवटे धारण करत, आम्ही राजरोस निसर्गाला ओरबाडत जगतो... पर्यावरणाचा समतोल उध्वस्त करत भावी पिढ्यांचं अस्तित्व धोक्यात टाकणारे 'विकासा'चे अल्पजिवी फायदे उपटत रहातो...** मग, सवड काढून कुठली तरी प्रार्थनास्थळं गाठतो (मंदिर, मस्जिद, चर्च, गुरुद्वारा, बुद्धविहार), नाहीतर कुठल्यातरी बनावट, संत–सद्गुरु–बाबाजी–स्वामींच्या कळपात सामील होतो आणि स्वतः ला 'धार्मिक' म्हणवून घेण्यात धन्यता मानतो (कदाचित, जर कुणाची निसर्गाप्रति, प्राणीमात्रांप्रति थोडी कुठे 'संवेदना' शिल्लक असलीच, तर त्यातून आतून जाणवत असलेली 'अपराधीपणा'ची बोच थोडी सौम्य होत असावी).

**या देशातली खरीखुरी आध्यामिक जाणिव नुसतीच क्षीण होत चाललीय असं नव्हे; तर, नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे! या विनाशकारी 'विकास–प्रक्रिये'त, जनसंख्या आणि जीवनशैली च्या विस्तारण्याने (खरंतरं, विस्फोटानं)... जल, जंगल, जमीन आम्ही बुद्धीवादी अहंकाराने नासवत–उध्वस्त करत चाललोय. 'तंत्रज्ञाना'ला, आम्ही 'ब्रह्मज्ञान' समजण्याची घोडचूक करुन बसलोय.... तंत्रज्ञानाचा आधार घेत आम्हीच, आता जणू या ब्रह्मांडाचे ब्रह्मा, विष्णू, महेश बनू पहातोय! तंत्रज्ञानातून उद्भवू शकलेल्या समस्या, तंत्रज्ञानानेच सहजी दूर करता येतील, या मस्तीने आपण निसर्गाशी द्यूत खेळतो आहोत.... त्यातूनच, गंगानदीवरचे अनेक ठिकाणचे भलेमोठे जलविद्युत–प्रकल्प काय किंवा कोकणातल्या जैतापूरसारखे महाकाय अणुविद्युत–प्रकल्प काय, नाणारचा महाकाय तेलशुद्धीकरण–प्रकल्प काय.... असे सगळे तथाकथित विकास–प्रकल्प अस्तित्वात येत जातात... जे अंति, महासंहारक विनाश घडवणार आहेतच. म. गांधी आणि जे. सी. कुमारअप्पांसारखे त्यांचे शिष्य, १० हेक्टरपेक्षा मोठं धरण, असताच कामा नये, असे सातत्याने प्रतिपादन करायचे. मोठी धरणे, ही आधुनिक भारताची मंदिरे होतं, असं म्हणणाऱ्या भारताचे पहिले पं. नेहरूंचंही मत कारकीर्दीच्या उत्तरार्धात बदललं होतं.** त्याकाळी, मोठ्या धरणांविरुद्ध कुठलीही जनआंदोलनं उभी राहीली नसताना, केवळ उद्भवलेली भीषण परिस्थिती पाहूनच पं. नेहरूंनी मोठं मन दाखवतं, आपलं मत बदललं होतं (कारण, पं. नेहरू हे अतिशय ज्ञानी, तरल व संवेदनशील पंतप्रधान होते... नरेंद्र मोदींसारखे संवेदनाशून्य नव्हते). नोव्हेंबर–१९५८ मध्ये केंद्रीय पाटबंधारे व जल महामंडळासमोर, छोट्यामोठ्या प्रकल्पांचे होणारे सामाजिक परिणाम, या विषयावर भाषण करताना.... पं. नेहरूंनी, मोठ्या धरणांसारख्या महाकाय प्रकल्पांना, स्वतःच उभारलेल्या मंदिरांच्या मखमाली सजावटीतून ओढून बाहेर काढत, थेट अवाढव्यतेचा महारोग असं विषादपूर्ण व अर्थपूर्ण संबोधन दिलं होतं! भाषणात पुढे जात, हा, विकासाची कास धरणाऱ्या भारतातला अत्यंत धोकादायक विचारप्रवाह असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं होतं.... पण, या अशा अतिशय विचारगर्भ व महत्त्वपूर्ण बाबी आमच्यासमोर कधिचं मांडल्या जात नाहीत (संदर्भ: Nehru Memorial Museum and Library–१९८८).

आमची मोठी धरणं, आजवरचे मोठे जलविद्युत–प्रकल्प, उरल्यासुरल्या जंगलांच्या जमिनीची प्रचंड धूप होऊन त्यात साठलेल्या अफाट गाळामुळे, आता आमच्या मार्गातली मोठी धोंड ठरु लागलीयत. तरीही, आम्ही मागे वळून पहायला, थबकायला तयार नाही.... संत निगमानंद, संत ज्ञान स्वरुप सानंद, संत गोपालदास, संत शिवदास यासारखी जाज्वल्य संतमंडळी तसेच, जागतिक पर्यावरणतज्ज्ञ केव्हाचेच इशारे देत आलेत; पण, आम्ही बहिरे–आंधळे झालेले आहोत. आता तर, 'संतमंडळी' जगाच्या कल्याणासाठी 'प्राणार्पण'ही करु लागलीत.... तरी आमचं अंधत्व दूर व्हायला तयार नाही, बहिरेपण संपायचं नांव घेत नाही!

तरीही, केरळातल्या 'शबरीमला' देवस्थानात महिलांच्या प्रवेशावरुन निरर्थक चर्चा झडत रहातात, महाराष्ट्रात 'धर्माचे अधिकारी' नव्हे; तर, डँबिस राजकारण्यांच्या हातात हात घालून बसलेल्या 'धर्माचे ठेकेदार' बनलेल्यांकडून संत रामदासांच्या नांवाने दंड'बैठका' काढल्या जातायत, कुणी 'मोहनदास करमचंद गांधी' नांवाच्या जाज्वल्य 'बापू'ला दूर सारत बेगडी 'बापू'ला जवळ करतायत.... 'रामनाम' चोपडीत लिहीत (अंतःकरणात रामाला न रुजवता) व्यर्थ आयुष्य खर्ची घालतायतं, साईबाबांचे अवतार म्हणवणाऱ्यांचे संप्रदाय गडगंज संपत्ती धारणकर्ते बनून जातायत.. शिमगा संपला तरी कवित्व संपत नाही, तसं संप्रदाय उभारणारा सरला तरी संप्रदाय, व्यवस्थेची ढाल हाती घेत, पुढे चाल करत रहातात..... या कुणाकुणालाही, खऱ्याखुऱ्या धार्मिकतेशी काहीही देणंघेणं नसतं! असते फक्त, सत्ता–संपत्तीकांक्षा (जी, राजकारण्यांशी जवळीक साधली की, आपसूकच लाभत रहाते आणि राजकारण्यांना त्यातून लाभतात हुकमी मतं) आणि बसल्या जागी धार्मिकतेच्या 'दुकानदारी'ची कांक्षा! योग–प्राणायामाचा बाजार भरवत शेकडो नव्हे;...,पृष्ठ क्र. ११ वर

## ...'धर्मराज्य-संदेश' ...पृष्ठ क्र. १० वरून

सहस्त्र कोटींची संपत्ती उभारणारे, यमुनेच्या तीरावरचा निसर्ग बिनदिक्कत उध्वस्त करणारे.... 'संत' म्हणवून घेण्याच्या किंचितसे तरी योग्यतेचे असू शकतात काय? फारतर, त्यांना यशस्वी उद्योगपती वा व्यावसायिक म्हणू शकतो आपण!

**खरीखुरी 'धार्मिकता' आणि आजचा सजीवसृष्टीच्या मुळावर उठलेला 'विकास' व तो 'विकास' घडवणारी ही आजची आधुनिक 'व्यवस्था'.... हातात हात घालून, एक पाऊल तरी सोबत चालू शकेल ??? एवढी साधी बाब, आपल्याला समजून घेणं अवघड जात असावं? ...की, आपण साऱ्यांनीच आपल्या आजच्या आधुनिक सोयीसवलतींसाठी झोपेचं सोंग कायमच धारण करायचं ठरवलय?**

**आपल्या सगळ्या धर्मग्रंथात आंतरिक विकासावर भाष्य आहे, असल्या विनाशकारी बाहेरच्या 'विकासा'वर नव्हे! माणसाकडून... नियतीला, परमात्म्याला सजीवसृष्टीची काळजी घेण्याची अपेक्षा असणार की, अवघ्या सजीवसृष्टीचीच थडगी रचून मोजक्याच पिढ्यांनी ऐशोआराम करत बेगुमानपणे व निर्दयतेनं सगळं संपविण्याची?**

विविध धर्मसंप्रदायींच्या तोंडातून, वरपांगीसुद्धा, गंगाकिनारीचे आमचे जाज्वल्य संत, गंगेसाठीच प्राणार्पण करत असताना चकार शब्द बाहेर पडू नये.... त्यातच, या संप्रदायांचं, 'व्यवस्थे'शी 'हातमिळवणी' असल्याचं व्यवच्छेदक लक्षण स्पष्ट दिसतय. या सगळ्या संप्रदायांची काय औकात की, ते या रक्त-पिपासू शोषक व्यवस्थेशी (Vampire State System) पंगा घेतील??? ....जी, आज खऱ्याअर्थाने, तातडीची आणि नितांत अशी काळाची गरज बनलेली आहे! कुणी एक भारतातलं 'ईशा' नांवाचं फाऊंडेशन, निघालयं भारतातल्या नद्या साफ-स्वच्छ करायला! कुणाच्या पैशानं, कुणाच्या प्रचंड आर्थिक पाठबळावर? ...तर, रिलायन्ससारख्या अनेक रासायनिक व कार्बन प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांच्या आर्थिक सहयोगातूनच! ज्यांनी नद्या, समुद्र, तलाव, विहीरी नासवल्या, गडगंज नफा कमावण्याच्या राक्षसी लालसेतून आरपार प्रदूषित केल्या, त्यांचं कंपन्या आता.... सौ चूहे खाके, बिल्ली चली हज को, असा फसवा-गोंडस मुखवटा धारण करत आमच्या नद्या स्वच्छ करणार? त्यांच्याकडून केलं जाणारं 'जलप्रदूषण', कार्बन-प्रदूषण कारखाने चालू ठेऊन थांबू शकतं कधि?? कुणाला गंडवताय, उल्लू बनवताय आणि कितीकाळ बनवू शकणार आहात??? ... सरतेशेवटी, नियती तुम्हालाआम्हाला सगळ्यांनाच अवचित गाठणार आहे सर्वनाशाच्या खिंडीत!!!

**मित्रहो, ...या औद्योगिकीकरणातून, आधुनिक चंगळवादी जीवनशैलीतून व अर्थव्यवस्थेतून रचले जाणारे, हे शोषण आणि प्रदूषणाच्या पातकांचे इमले, आपल्यालाच गाडण्याएवढे भलेमोठे झालेत.... ते कधि कोसळतील, आपल्याला खाली दडपून टाकीत आपला श्वास कायमचा रोखतील, याचा काही नेम नाही... हा, फक्त आता काही दशकांचाच खेळ उरलाय.**

**स्वामी निगमानंद, स्वामी ज्ञानस्वरुप सानंद... या पुण्यात्म्यांच्या महान बलिदानाचा हा इशारा, फक्त नरेंद्र मोदींच्या नृशंस प्रशासनालाच नाही.... तर, अवघ्या विश्वाला आहे!!!**

***......राजन राजे***

(अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष....
भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणवादी हरित पक्ष)

## लोकसत्तेतील दे दान; कोणते 'गिऱ्हाण'? या अग्रलेखातून... (संकलक गद्य)

"भूक असताना अन्न सेवन केल्यास प्रकृती, नसताना केल्यास विकृती आणि भूक असतानाही आपल्यापेक्षाही अधिक भुकेलेल्यास ते दिल्यास ती संस्कृती'', अशा अर्थाचे आचार्य विनोबा भावे यांचे एक वचन आहे. त्याचा आधार घेतल्यास आपल्या अनेक कंपन्या, उद्योग कसे संस्कृतीचे पाईक, संस्कृतिरक्षक इत्यादी आहेत हे पाहून अभिमानाने छाती फुलून येईल. या संस्कृतिरक्षणाचा साद्यांत तपशील 'द हिंदू' या दैनिकाने गुरुवारी प्रकाशित केला असून ज्यांस ते मुळातून वाचणे शक्य होणार नाही, त्यांच्यासाठी त्या वृत्तान्ताचा हा अन्वयार्थ.

**'द हिंदू'चे संशोधक वृत्त याच संदर्भातील आहे. त्यातून ज्या कंपन्यांच्या खात्यात कसलाही नफा नाही त्यांनीही राजकीय पक्षांस कशा अवाढव्य देणग्या दिल्या आणि या अवाढव्य देणग्यांतील अवाढव्य वाटा एकाच पक्षास कसा मिळाला याचा तपशील समोर येतो. त्याची दखल घेणे हे प्रबोधक आणि मनोरंजक असे दोन्ही एकाच वेळी ठरू शकेल. प्रबोधन करणारे म्हणायचे कारण भांडवलाची फेरगुंतवणूक, कर्मचाऱ्यांस अधिक वेतन इत्यादी कारणांपेक्षा आपले उद्योगपती राजकीय पक्षांवर अधिक रक्कम खर्च करू इच्छितात हे यातून दिसते आणि इतक्या साऱ्या राजकीय कृपाभिलाषींना एकाच वेळी पाहणे हे मनोरंजक ठरते.**




यानुसार १२ एप्रिल २०१९ ते २४ जानेवारी २०२४ या काळात ४५ कंपन्यांनी एकूण १४३२ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले. हा काल-संदर्भ महत्त्वाचा. आधीच्या लोकसभा निवडणुका कधी झाल्या आणि यंदा सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण कधी निकालात काढले या तारखा लक्षात घेतल्यास ही बाब ध्यानी येईल. या १४३२ कोटी रुपयांपैकी १०६८ कोटी रु. हे केंद्रातील सत्ताधारी पक्षास दिले गेले. हे प्रमाण साधारण ७५ टक्के इतके भरते. तथापि यातील प्रबोधक आणि मनोरंजक तपशील असा की हा इतका दानधर्म करणाऱ्या ४५ कंपन्यांपैकी ३३ कंपन्यांनी कमावलेला नफा वट्ट शून्य रु. अथवा उणे इतका आहे. परत या ३३ कंपन्यांखेरीज सहा कंपन्या अशा आहेत की, त्यांनी खरेदी केलेल्या निवडणूक रोख्यांची रक्कम त्यांनी कमावलेल्या एकूण नफ्यापेक्षा किती तरी अधिक आहे. उर्वरित तीन कंपन्यांनी नफा कमावला. पण तरी त्यांनी कर भरल्याची नोंद नाही आणि अन्य तीन कंपन्यांनी किती कमावले, किती कर भरला याची कसलीही नोंदच उपलब्ध नाही. सदरहू वर्तमानपत्रातील पत्रकार आणि स्वतंत्र सांख्यिकी विश्लेषकांनी रोखे खरेदी करणाऱ्या तब्बल ३८५ कंपन्यांच्या ताळेबंदांची, जेथून रोखे खरेदी केले गेले त्या स्टेट बँकेने प्रसृत केलेल्या माहितीची आणि निवडणूक आयोगाने उघड केलेल्या तपशिलाची सविस्तर छाननी केली. या ३८५ कंपन्यांकडून एकत्रितपणे सुमारे ५३६२ कोटी रुपयांची रोखेखरेदी झाली आणि ती सर्व केंद्रीय सत्ताधारी पक्षाकडे वळती केली गेली, ही माहिती समोर येते. हे दानशूर कोण हे समजून घेणेही तितकेच आनंददायक!

ते सर्व पाहून पडणारा प्रश्न एकच. स्वत:च्या तिजोरीस खार लावून या इतक्या भरभक्कम देणग्या देण्याची गरज या कंपन्यांस का वाटली असेल? भरपूर नफा कमावणाऱ्याच्या मनात अशी दातृत्व भावना दाटून आली असेल तर ते समजून घेता येण्यासारखे. पण या कंपन्यांकडे दातावर मारायला नफा नाही, सरकारी कर भरायला निधी नाही आणि तरी त्या कोटी कोटी रुपयांच्या देणग्या कशा काय देतात?

अगदी अलीकडेपर्यंत चंद्र/सूर्य ग्रहण सुटले की, गावोगाव 'दे दान, सुटे गिऱ्हाण' असे हाकारे घालत याचक दारोदार येत अणि श्रद्धाळू त्यांना यशाशक्ती दानधर्म करत. यातील उद्योगपतीही असेच श्रद्धाळू आहेत हे मान्य केले तरी, त्यांचे असे कोणते 'गिऱ्हाण' लागले/सुटले की, त्यांनी इतका दानधर्म करावा, हा प्रश्न. विद्यमान सरकारने एखादी समिती वगैरे नेमून ही चौकशी केल्यास, सत्ताधीशांची प्रतिमा उजळण्यास मदत होईल. त्यासाठी नवनैतिकवादी आवश्यक तो दबाव आणतील, ही आशा.

पाकिस्तानचा उठताबसता उद्धार करणारे, पाकिस्तानला जिंकून 'अखंड हिंदुस्थान'ची दिवास्वप्न पहाणारे आणि महामूर्ख 'अंधभक्तां'ना ती स्वप्न दाखवणारे...ज्यापद्धतीने, सध्या निवडणूक-प्रक्रियेत बेफामपणे वागतायत, ते पहाता, ते भारताचा 'पाकिस्तान' करतायत की, काय...याची साद्यंत शंका यावी!

आपण पाकिस्तानमध्ये अलिकडेच पाहिलं की, निवडणूक-निकालानंतर तेथील लष्कर, निवडणूक-आयोग आणि न्यायसंस्था एकत्र येऊन...सर्वांनी मिळून जबरदस्तीने निवडणूक हरलेल्यांचं सरकार बनवलं!

पाकिस्तानला, वर्षाचे बारा महिने दिवसरात्र शिव्याशाप देत रहायच्या; पण, गुपचूप ज्या कर्जबाजारी, लाचार पाकिस्तानची 'Failed State' म्हणून जगभर नाचक्की झालीय व जेथील जनता अत्यंत दुःखी, दरिद्री व संतप्त आहे... त्या पाकिस्तानचाच, 'आदर्श' डोळ्यासमोर ठेऊन, त्याच्याच पावलावर पाऊल ठेऊन वाटचाल सुरु ठेवायची...ही यांची घृणास्पद कपटनीति आहे...तेव्हा, सावध राहून काळाच्या हाका ऐका!

...थोडक्यात, 'मुँह में राम, बगल में छुरी' (जी यांची खरीखुरी राजनीति मुळातून आहेच) उक्तिनुसार, 'इनके मुँह में भारत और दिल में पाकिस्तान है', असं म्हणायची अत्यंत वाईट वेळ, तमाम भारतीय जनतेवर आलीय...

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# तुमच्यात सर्वधर्मसमभाव कोणी रुजवला ?

तुमच्यात सर्वधर्मसमभाव कोणी रुजवला? असा प्रश्न नव्यानेच ओळख झालेल्या एका मित्राने विचारला. त्यावर माझे निःसंदिग्ध उत्तर होते, रामकृष्ण परमहंस यांनी!

माझ्या या उत्तराने त्याला आश्चर्य वाटले. त्याला माझे उत्तर अनपेक्षित होते. त्याला वाटले होते की, मी कोणा पाश्चात्य तत्ववेत्याचे किंवा एखाद्या एथिस्ट माणसाचे नाव सांगेन.

त्याने तसे व्यक्त करताच, मी म्हणालो, कारण, मी लहानपणापासून रामकृष्णांच्या अशा गोष्टी ऐकत वाढलो की त्यांनी भारतातील अनेक संप्रदायांच्या साधनेसोबतच मुस्लिम व ख्रिश्चन धर्मांच्या शिकवणीप्रमाणे साधना करुन पाहिली होती आणि हे सगळे मार्ग त्याच अंतिम सत्याकडे घेऊन जातात, असे आपल्या अनुभवांती त्यांनी निःसंदिग्धपणे सांगितले होते. जतो मत, तथो पथ!



**मी इथे स्पष्ट करेन की, सर्वधर्मसमभाव म्हणजे दुसऱ्या धर्माच्या लोकांना सहन करणे नव्हे, तर त्यांचा धर्म हादेखील माझ्या धर्मासारखाच देवाकडे जाण्याचा मार्ग आहे, हे मनापासून पटणे. रामकृष्णांच्यामुळे माझ्या मनात हे रुजले.**

**त्यावर माझ्या मित्राचा प्रश्न होता, जर सर्वधर्मसमभाव तुम्हाला एका धार्मिक माणसाकडून मिळालाय असे तुम्ही म्हणताय तर, मग तो इतरांना का मिळत नाही? बहुतांश धार्मिक माणसे परधर्मद्वेषी का दिसतात?**

कारण, त्यांचा धर्माच्या चिरंतन मुल्यांवर विश्वास नसतो... बहुतांशी लोक धर्माला ईश्वराकडे जाण्याचा मार्ग म्हणून न बघता, त्याला एक टोळी असल्यासारखे बघतात म्हणून. धर्माची बाह्य चिन्हे कोणी मिरवत असेल तर, तो धार्मिक असतोच, असे नाही. रामकृष्ण परमहंस ना भगवे कपडे घालत, ना रुद्राक्षाच्या माळा घालत, ना कोणता टीळा लावत. त्यांचा अनुनय करण्याचे बाजूलाच राहीले, अनेक लोकांनी तर, ब्रम्हविद्येसारख्या मोक्षशास्त्रालाच भोंदू वैदूगिरी बनवून टाकले आहे, मी म्हणालो.

मला जर माझ्या बाबांकडून रामकृष्ण परमहंस यांच्याविषयी कळले नसते तर, कदाचित मीदेखील धर्माला जंगली लोकांच्या टोळ्यांसारख्या टोळ्या समजून बसलो असतो.

माझ्यावरील या संस्कारांमुळे होते काय की, जेव्हा दुसऱ्या धर्माचा सण असतो, तेव्हा मला त्या धर्माची साधना करणारे रामकृष्ण परमहंस आठवतात.

रामकृष्ण परमहंस येशू ख्रिस्तांविषयी जाणून घेण्यासाठी शंभू चरण मलिक या आपल्या शिष्याकडून बायबलमधील वेचे वाचून घेत.

**एकदा ते यदुनाथ मलिकांकडे गेले असता त्यांनी भिंतीवर माता मेरी आणि बाल येशूची तसबीर पाहीली आणि त्यांना भावावेश झाला. त्यानंतर ते जिथे ध्यान धारणा करीत त्या पंचवटीमध्ये त्यांना भगवान येशू ख्रिस्तांचे दर्शन झाले.**

*– डॉ. रुपेश पाटकर*

# वॉशिंग मशीन शब्द घराघरात पोहोचला, तेवढा हेयर कटिंग सलून नाही पोहोचला... तो पोहोचवला पाहिजे!

## वॉशिंग मशीनमध्ये व्यक्तीकेंद्री नॅलिसीस पुढे येते; तर, कटिंग-सलूनमध्ये सिस्टिम केंद्री....

इतर पक्षातील भ्रष्ट नेते, राज्यकर्त्या भाजप पक्षामध्ये सामील झाल्यानंतर, त्यांच्यावरचे भ्रष्टाचाराचे डाग, जणू काही धुतले जातात, अशाअर्थाने वॉशिंग मशीन हा शब्दप्रयोग, अगदी सामान्य नागरिकांच्या बोलण्यात येऊ लागला आहे.

**चांगली गोष्ट आहे. मनाची, कल्पनाशक्तीची पकड घेणारे, असे चपखल शब्द, चपखल घोषणा कॉइन करणे, लोकांचे राजकीय शिक्षण होण्यासाठी खूप महत्त्वाचे असते. त्या तुलनेत कटींग सलून किंवा हेयर कट, हा शब्द पोहोचला पाहिजे.**

**माझ्या दृष्टीने कटिंग सलून, हेयर कट हा, सध्याच्या कॉर्पोरेट-केंद्री सिस्टिमचे अधिक सम्यक वर्णन करणारा शब्द आहे.**

### कोठून आला हा शब्द?

कॉर्पोरेटची बँकांकडची थकीत कर्जांची, ज्यावेळी अर्धन्यायिक यंत्रणेसमोर (एनसीएलटी) सुनावणी होते, त्यावेळी ही अर्धन्यायिक यंत्रणा, त्या कंपन्यांना त्यांच्या थकीत रकमेत मोठी सूट देते. त्या दिलेल्या सूटला हेयर कट असे म्हणण्याची पद्धत आहे. म्हणजे, कंपनी तिच्या धनकोंना, सर्व मिळून समजा १०० कोटी रुपये देणे असेल तर, ते कोर्ट म्हणते की, ओके... तुम्ही तुमच्या धनकोंना १० कोटी द्या, ९० कोटी नाही दिले तरी चालतील! म्हणजे, ९० कोटींचा 'हेयर कट' धनकोंना घ्यायला भाग पाडले जाते किंवा तेवढ्या पैशावर धनकोंना पाणी सोडावे लागते.

**अशा पद्धतीने, मोठ्या कंपन्यांचे हजारो कोटी रुपये माफ केले गेले आहेत/जात आहेत. (खाली दिलेला तक्ता बघा) खरे तर, आता ही काही बातमी नाही राहिली. त्याअर्थाने कॉर्पोरेटच्या कर्जमाफीचा/दिवाळखोरी, नादारी संबंधातील कायदा, त्याची अर्धन्यायिक यंत्रणा, बँकांच्या व्यवस्थापनाने मोठ्या कंपन्यांचे, वन टाइम सेटलमेंटमधून माफ केलेले कर्ज, या सगळ्या सिस्टिमला आपण हेयर कटिंग सलून म्हणत आहोत!**

वाजवी रकमेपेक्षा, कमी भावात एखादी वस्तू विकावी लागली तर, त्याला हेयर कट म्हणता येईल. ही संकल्पना अजून फुलवता येईल. आपली पोस्ट हेयर कटबद्दल नाही; तर, वॉशिंग मशीनची चर्चा सार्वजनिक व्यासपीठांवर होते; पण, 'हेयर कटिंग सलून'च्या होत नाहीत, याबद्दल आहे...

आठवून बघा, वॉशिंग मशीन असा शब्द वापरला की, कोणत्यातरी भ्रष्ट नेत्याचे नाव आपल्याला आठवते. पण, एखाद्या कंपनीला हजारो कोटी रुपये हेयर कट मंजूर केला गेला असेल; तर, तो मंजूर करणाऱ्याचे नाव मीडियात येत नाही... कारण? ...कारण, तो निर्णय घेणारी एक संस्था असते, ती कायद्याच्या फ्रेममध्ये निर्णय घेते, असा दावा करते. सर्व मिळून एक सिस्टीम असते, त्याअंतर्गत हे निर्णय होतात.

असे का होते तर, आपल्याला आजुबाजुला जे घडत आहे, त्याकडे व्यक्तिकेंद्री दृष्टिकोनातून बघायचे ट्रेनिंग दिले गेले आहे. माणसे चांगली किंवा वाईट, माणसे स्वच्छ किंवा भ्रष्ट असतात, असे आपण बघत असतो. पण, सिस्टीममधून होणारी लूट, कायद्याच्या फ्रेममधून होणारी, न्यायालय/अर्धन्यायिक यंत्रणांच्या मंजुरीने होणारी लूट, त्याबद्दल आपण फारसे चर्चा करत नाही. कारण, आपल्याला सिस्टीम-केंद्री विचार करायला, शिकवलेच गेले नाही... जे गरजेचे आहे.

निवडणूक रोख्यांचेच घ्या... कोणत्या पक्षाला किती हजार कोटी, भाजपाला किती हजार कोटी, याचे आकडे आता सर्वांच्या जिभेवर आहेत. पण 'क्वीड प्रो-क्वो'मधून जी कंत्राटे/प्रकल्पे मिळवली गेली, त्याचे आकडे ४ लाख कोटी आहे, याची चर्चा होत नाहीये. म्हणजे, निवडणूक रोखे रक्कम फक्त ४ किंवा ५ टक्के आहे. आपण फक्त ४ टक्क्यांवर चर्चा करत बसतो. बाकीचे ९६ टक्के? राजरोसपणे कामे सुरुदेखील झाली आहेत.

### मोठ्या कॉर्पोरेट्सनी चालवलेली लूट....

मग ते हेयर कट असू देत, write-off असू देत, जनविरोधी आर्थिक धोरणे, जनविरोधी कायदे मान्य करुन घेणे असू दे, सार्वजनिक मालकीचे उपक्रम, जमिनी, पाणी स्वस्तात पदरात पाडून घेणे असू दे, मानवी श्रमाला त्याचा मोबदला न देणे असू दे, पर्यावरणाची हानी... Negative externalities म्हणून, थियरी बनवणे असू दे...

या सगळ्यांची रुपयातील मूल्यं, काही दशलक्ष कोटी रुपये आहे. यावर ना निती आयोग संशोधन-पेपर काढणार, ना सुटेड-बुटेड अर्थतज्ज्ञ. त्यांचा 'स्मोक-स्क्रीन' आहे, जे सगळे कायद्याला धरुन आहे आणि कायदा जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींनी बनवला आहे; म्हणजे, त्याला एकप्रकारे जनतेची संमती आहे....

**त्यांना, आपण व्यक्तींची नावे घेऊन, भ्रष्टाचारावर सतत बोलायला हवे आहे. म्हणजे, मग सिस्टमबद्दल कोणी बोलणार नाही. म्हणून मग, गावंढळ अण्णा, कोट्यवधी रुपये घालून प्रमोट केले जातात. पण, सतत कॉर्पोरेट, वित्त-भांडवली सिस्टिमवर बोलले पाहिजे. राजकीय नेते याच सिस्टीमचे वाहक आहेत. त्या व्यक्तींचं सार्वजनिक चर्चांचा अवकाश व्यापतात.**

**सिस्टिम आणि राजकीय नेत्यांमध्ये, तेच 'डील' आहे. तुम्ही सगळा दोष तुमच्यावर घ्या. सिस्टिमवर कोणी बोलले नाही पाहिजे. तरुणांना आवाहन, राजकीय अर्थव्यवस्थेकडे नैतिक 'व्यक्तिवादी' नशेतून बघू नका, खूप डेंजरस नशा असते ती... सिस्टिम-केंद्री दृष्टिकोन आत्मसात करा !!!**

*....संजीव चांदोरकर*

# जाहीरनामा पर्यावरणाचा; नव्हे, अस्तित्वाचा!

१ मे, महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिन. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीत मुंबईतील गिरणी कामगारांचा सिंहाचा वाटा होता. अत्रे, डांगे आणि एस. एम. नी अशक्य ते शक्य केले. यशवंतराव चव्हाणांनी नेहरूंचे मन वळवले. मात्र, एका योग्य गोष्टीबाबत चांगल्या माणसांच्या मतभेदामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०५ हुतात्मे झाले.

**महाराष्ट्र एकाच वेळी सामाजिक सुधारणा आणि तंत्रज्ञानाची प्रगती याबाबत अग्रेसर होता. गांधीजींच्या द्रष्ट्या नेतृत्त्वाच्या प्रभावाखाली असलेल्या भारतात वैचारिक प्रबोधन आणि भौतिक प्रगती यातील भेद जनतेला समजत होता. परंतु, सन १९७० पासून जागतिक बँकेसारख्या संस्थांनी 'विकास' हा शब्द रूढ केला. नेमके त्याच वेळी त्यांनीच 'पर्यावरण' हा शब्द देखील प्रचारात आणला. 'भौतिक विकास' आणि 'पर्यावरण रक्षण', या एकाच वेळी शक्य नसलेल्या कल्पनांचा जोरात वापर सुरु झाला.**



**महाराष्ट्रात सन १९९५ पासून ५०–१०० वर्षांपूर्वी युरोप अमेरिकेने केलेल्या भौतिक औद्योगिक विकासाचे आंधळे अनुकरण सुरु झाले. नितीन गडकरी पुसदच्या सभेत उष्णतेने भोवळ येऊन कोसळणे... त्यांनीच केलेल्या बेधुंद पायाभुत संरचना विकास, हे नाव दिलेल्या प्रक्रियेचे फलित आहे. रस्ते, हायवे, पूल बांधण्याचा धडाका... ही विनाशाची वाटचाल होती. मोटार, वीज आणि सीमेंट कॉंक्रिट चा बेछूट पुरस्कार पृथ्वीवर ९५% कार्बन उत्सर्जन घडवतो. याने तापमानवाढ स्फोटक बनली. नंतर नितीन गडकरींनी भारतात याची अंमलबजावणी केली. त्याने तापमानवाढ महाविस्फोटक बनली.**

**महाराष्ट्र व भारताच्या आर्थिक–औद्योगिक प्रगतीचे प्रतीक असलेली मुंबई, अतिवृष्टीने बुडण्याची २६ जुलै–२००५ची दुर्घटना, उत्तराखंडची हिमनद्या घसरण्याची १५ जून २०१३ची केदारनाथ दुर्घटना... या तापमान वाढीच्या, हवामान बदलाच्या म्हणजेच, औद्योगिकीकरणाचेऔउ दुष्परिणाम आहेत.**

१९६ देशांनी मानवजात वाचविण्यासाठी पृथ्वीचे सरासरी तापमान, उद्योगपूर्व काळाच्या तुलनेत २ अंशाने वाढू नये, असा पॅरिस येथे केलेला करार अयशस्वी ठरला आहे. ऑगस्ट २०२० मधेच २ अंश सेंटीग्रेट ची वाढ नोंदली गेली आहे.

सध्या महासागर, दरवर्षी पूर्वीपेक्षा अधिक तापत आहेत, हे भयावह आहे. महासागर, पर्वत आणि ध्रुवांवरील बर्फाची वेगाने वाफ होत आहे. ही वाफ पृथ्वीवर अनियमित पद्धतीने विक्रमी स्वरुपात बर्फवृष्टी वा अतिवृष्टीच्या स्वरुपात कोसळत आहे... हे हिमयुग येणे नाही. हे, तापमान वाढ महाविस्फोटक बनणे आहे. उन्हाळ्यात अवकाळी पाऊस व बर्फवृष्टी हा त्याचा भाग आहे.

उच्चतम तापमान ६५ ते ७० अंश सेंटीग्रेट पर्यंत जात आहे. उदा. कुवेत. भारतातही राजस्थान व चंद्रपूर येथे ५२ ते ५५ अंश तापमान नोंदले गेले. उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी, महापूर, अवर्षण, वणवे, घटते भूजल, बर्फवृष्टी, अवकाळी पाऊस, अन्न उत्पादनात व जैविक विविधतेत घट हे औद्योगिकीकरणाने घडवलेल्या तापमान वाढीचे व हवामान बदलाचे परिणाम आहेत. आपल्या जन्मदात्या पृथ्वीला शरण जाणे, हाच फक्त यावर उपाय आहे.

सध्या संसदेचे प्रतिनिधी निवडण्यासाठी अनेक टप्प्यांत निवडणूक चालू आहे. पक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध झाले आहेत. 'विकास' या मुद्द्यावर सर्वांचे एकमत आहे. म्हणजे, जोरात विकास करायला हवा, यावर पक्षांचे आणि जनतेचे एकमत आहे. पंतप्रधान मोदींचा मतदारसंघ वाराणसी (काशी किंवा बनारस) हे आध्यात्मिक आणि धार्मिक केंद्र आहे. भारतीय संस्कृतीचे प्रतीक मानले गेलेल्या गंगेच्या काठावरील, हे संत कबीराचे शहर, 'गंगा जमनी तहजीब', म्हणजे धार्मिक सलोख्यासाठी प्रसिद्ध आहे.

या शहरात मोदींच्या कार्यकाळात मोठे रस्ते, पूल–उड्डाणपुलांसारखे पायाभूत संरचना प्रकल्प केले गेले. याला विकास म्हणतात... परंतु, त्याचवेळी देशात मुली व स्त्रियांवरील बलात्कार, दलित व अल्पसंख्याकांच्या हत्यांनी कहर केला. मणिपूरला महिलांना विवस्त्र करून धिंड काढणे व खुद्द वाराणसीत बनारस हिंदू विद्यापीठातील मुलींवर विद्यापीठाच्या आवारात भाजपच्या आय. टी. सेलच्या पदाधिकाऱ्यांनी केलेला बलात्कार, हे यातील काही नमुने.

**प्रश्न असा आहे की, हा भौतिक विकास करून काय मिळवले? देश तर काही शतकांपूर्वीच्या मध्ययुगीन मानसिकतेत गेला. सत्य, प्रेम, अहिंसा, न्याय, समता, धर्मनिरपेक्षता, नैतिकता ही स्वातंत्र्य चळवळीत जोपासलेली जीवनमूल्ये सत्ताधाऱ्यांकडून रोज पायदळी तुडवली जात आहेत.**

**आता यापुढचा विचार करु. इंडिया गठबंधनातील पक्षांचे जाहीरनामे, सामाजिक न्याय व इतर मूल्यांचा पुरस्कार करतात. इंडिया गठबंधन सत्तेवर आले; न्याय, लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तिचे स्वातंत्र्य यांच्या रक्षणासाठी ते यावेच... परंतु, त्याही परिस्थितीत पायाभूत संरचना विकास, रिफायनरी, औष्णिक विद्युत केंद्रे, खाणी, अणुप्रकल्प, बंदरे, विमानतळ, हायवे, पूल, कारखाने इ. केले जाणार. या प्रकल्पांशी औद्योगिक जीवनशैली आणि रोजगार जोडले आहेत.**

अशा स्थितीत, युरोपात पर्यावरणाची चळवळ झाली. त्यातून हरित (ग्रीन) पक्ष बनले. ते इतर पक्षांबरोबर सत्तेतही आले. परंतु, त्यामुळे पृथ्वीवरील विनाशाची प्रक्रिया थांबली नाही. कारण, या हरित पक्षांनाही 'भौतिक विकास' मान्य आहे. मोटार, वीज, सीमेंट, वॉशिंग मशिन, वातानुकूलन यंत्रे, टीव्ही, कॉम्प्युटर, मोबाईल आणि अशा हजारो स्वयंचलित यंत्रे व वस्तूंचे कोट्यवधींच्या संख्येने सतत होत असलेले उत्पादन हवे आहे. कृत्रिम जगात उपभोगवाद वाढण्याने आणि औद्योगिकरणासाठी बनलेल्या शिक्षणामुळे प्रगती व विकासाचे लेबल लावलेल्या या जीवनशैलीचा त्याग करण्याची तथाकथित आधुनिक माणसाची तयारी नाही.

म्हणून इतरांचे सोडाच; पण, पर्यावरणवादी पक्षांचे जाहीरनामेदेखील विशिष्ट मर्यादा ओलांडत नाहीत. औद्योगिकरण, शहरीकरण व अर्थव्यवस्थेच्या रुळलेल्या वाटेवरच ते चालतात. युरोपात व अमेरिकेत असूनही ते कोपर्निकस, ब्रूनो व गॅलिलिओंचा सत्य शोधण्याचा व ते अंगिकारण्याचा प्रयत्न करत नाहीत. ते विज्ञानाचे वारसदार नाहीत. गतीचे नियम, गुरुत्वाकर्षणाचा सिध्दांत, ऊर्जेचे सूत्र... याचा प्रबोधनाशी, सत्याशी व शोषणमुक्तीशी संबंध आहे, परंतु मोटार वा अणुबॉम्ब बनवणाऱ्या तंत्रज्ञानाशी नाही हे, ते समजून घेत नाहीत. उपभोगवादावर उभारलेल्या अर्थव्यवस्थेने त्यांना तंत्रज्ञानाचे म्हणजे जेम्स वॅटचे, एडिसनचे वारसदार बनवले आहे. म्हणून, सुखाच्या शोधाच्या नावाने, ते जगाला विनाशाच्या खाईत लोटत आहेत.

**या भौतिक विकासाचा परिणाम म्हणून पृथ्वीची वास्तव स्थिती भीषण आहे. दरवर्षी ०.२ अंश सरासरी वाढ, या गतीने तापमानवाढ होत आहे. याचा अर्थ दर पाच वर्षांत १ अंशची सरासरी तापमानात वाढ. पुढील वर्षी आपण सन १७५६ च्या, म्हणजे पहिले स्वयंचलित यंत्र येण्याच्या वर्षाच्या तुलनेत ३ अंशची वाढ अनुभवणार आहोत. ही प्राणघातक वाढ असणार आहे. मानवजात व जीवसृष्टीच्या अंताची नांदी!**

**यापुढे, दर पाच वर्षांत १ अंशाची सरासरी वाढ असेल, यात कोणतीही अतिशयोक्ती नाही. मानवजात व दृश्य जीवसृष्टी फक्त २५ ते ३५ वर्षांत नष्ट होईल. अशावेळी देश, पक्ष, धर्म, जाती, भाषा, प्रांत इ. सर्व भेद निरर्थक ठरतात. विविध सरकारे, ज्या औद्योगिकरणाचा भाग आहेत, ते औद्योगिकीकरण पृथ्वीच्या क्षमतांमुळेच चालू होते. एखाद्या बांडगूळ किंवा कॅन्सरप्रमाणे त्याने पृथ्वीच्या जीवनाचे शोषण केले. जीवन व ते शक्य करणारी पृथ्वीच्या चारही आवरणांची जडणघडण संपुष्टात आल्याने... हे बांडगूळ, हा कॅन्सरही नष्ट होणार आहे!**

**या भीषण संकटातून वाचायचे; तर, पूर्ण मानवजातीने खऱ्या अर्थाने पर्यावरणाचा म्हणजे, आपल्या अस्तित्वाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याची गरज आहे. याबाबत भारत मार्गदर्शन करु शकतो.**

भारताला सत्याग्रहाची परंपरा आहे. ब्रिटीशांनी, सन १८१० मधे बनारस शहरातील नागरिकांवर असह्य कर लादला. तेव्हा बनारसने सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला. ...पृष्ठ क्र. १४ वर

...पृष्ठ क्र. १३ वरुन

ब्रिटीशांची दडपशाही वाढल्यावर बनारसच्या रहिवाशांनी, सर्व शहर रिकामं केले व ते आसपासच्या जंगलात राहू लागले. अशी दोन वर्षे गेल्यावर ब्रिटिश नमले. त्यांनी कर रद्द केला.

गांधीजींनी या सत्याग्रही परंपरेचे पुनरुज्जीवन केले. आज स्वयंचलित यंत्रामुळे जीवन नष्ट होणार आहे . शंभर वर्षांपूर्वी, जगाला विनाशाकडे नेणाऱ्या औद्योगिकरणाचे प्रतीक असलेल्या, मँचेस्टरच्या यांत्रिक कापड गिरण्यांना, भारतात हजारो वर्षे स्वावलंबन टिकवणाऱ्या चरखा आणि हातमागाद्वारे गांधीजींनी आव्हान दिले. प्रत्येक भारतीयाने गांधीजींचे 'हिंद स्वराज्य' वाचावे. म. गांधींच्या भारताने जगाला मार्ग दाखवलेला आहे. आपण पृथ्वीवरील सजीव, जीवनाच्या जाळ्याचा भाग आहोत. कृत्रिम वस्तुंच्या मानवनिर्मित जगाचा भाग नाहीत ...याचे भान तत्काळ येण्याची गरज आहे.

पृथ्वी जीवन देण्यासाठी आहे, नोकरी देण्यासाठी वा नोकरी देणारे उद्योग चालवण्यासाठी नाही. यातूनच कार्बन-उत्सर्जन होत आहे... हरितद्रव्य व पाण्याचा क्षणोक्षणी नाश होत आहे.

पृथ्वीवर पृथ्वीच्या विरुद्ध जाणारी कोणतीही अनैसर्गिक पद्धती यशस्वी व शाश्वत होऊ शकणार नाही. काही शेकडा वर्षांत नष्ट झालेल्या जगातील सर्व संस्कृती, याची साक्ष देतात. भारतीय संस्कृती ही एकमेव संस्कृती तिच्या संयम, शहाणपण व साधेपणामुळे टिकली. हे गुण सोडल्याने आपण स्वतःबरोबर जगाचा विनाश घडवणार आहोत. नैसर्गिक किंवा शेकडो वर्षांची परंपरागत शेती, चरखा व हातमागावर वस्त्र आणि माती, बांबू व कुडाची शाश्वत घरे... याद्वारे, भारतीय संस्कृती हजारो वर्षे अखंड प्रवाहित राहिली. रस्त्यांचा अभाव हे भारतीयांचे मागासपण नव्हते... ते भारतीयांचे शहाणपण होते, ती भारतीय खेड्यांची स्वयंपूर्णता होती. भारताचा विकास, आत्मिक, अध्यात्मिक, नैतिक होता, भौतिक नव्हता...पृथ्वीला तेच मान्य आहे.

**नोकरी उदरनिर्वाहासाठी लागते, असे कोणी म्हणू नये. ते कोरोनाच्या लॉकडाऊनमध्ये स्पष्ट झाले आहे. आज माणसे उदरनिर्वाह करत नसून मोटार, वीज, सीमेंट, वॉशिंग मशिन, एसी, टीव्ही, कॉम्प्युटर, मोबाईल इत्यादींचा निर्वाह करत आहेत. अगदी हत्ती आणि व्हेलसारख्या, अलिकडेपर्यंत लाखो वा कोटींच्या संख्येने असलेल्या महाकाय सजीवांचे पोटही पृथ्वीने सहज भरले होते. तर टीचभर पोटाच्या माणसाला ती जगवणार नाही काय? पण आज माणसाने जीवनाच्या ऐवजी जीवनशैलीच्या नादी लागून मुंगीलाही जगणे अशक्य केले आहे. आपल्याला मुला-नातवंडांचे अस्तित्व हवे असेल तर आपण मोटार, कोळसा जाळून बनलेली वीज व सीमेंट काँक्रिटचा नाद सोडू. त्याची आपणावर कुणी जबरदस्ती तर केलेली नाही.**

भारतीय, मँचेस्टरच्या स्वयंचलित यंत्राने लादलेल्या गुलामगिरीला तोंड देण्यासाठी न्यायालयात गेले नाहीत की ब्रिटीश सरकार वा राणीपुढे त्यांनी विनवणी केली नाही. निर्वैर अनासक्त पद्धतीने सत्याग्रह करुन स्वातंत्र्य मिळवले व जगाला केवळ स्वातंत्र्याचाच नाही तर अस्तित्वात राहण्याचा मार्ग दाखवला.

आपण भारतीय, पाश्चात्यांचे अनुकरण करण्याच्या नादात स्वतःचे आचरण पृथ्वीसुसंगत करण्याचे तत्त्व, योग विसरलो आहोत.

जीवनाच्या रक्षणासाठी कोणत्याही रूढ विचारसरण्यांची वा कोणाशीतरी संघर्ष करण्याची गरज नाही. आपले आयुष्य कसे जगायचे, हे प्रत्येकाच्या हाती आहे. अडथळा आपल्या इच्छांचा आहे. प्रगती, प्रतिष्ठा, विकास, सोय, सुख इ. मिथ्या कल्पनांचा आहे. तो झुगारुन दिला की, आपण मुक्त होतो...या मुक्तित जीवन आहे.

हा मानवजातीच्या व जीवसृष्टीच्या अस्तित्वाचा जाहीरनामा आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्याही पक्षाची, सरकारची वा सत्तेची गरज नाही. तोच स्वातंत्र्यलढ्याचा आशय होता.

*डॉ. गिरीश राऊत*
निमंत्रक: भारतीय जीवन व पृथ्वीरक्षण चळवळ
(९८६९० २३१२७)

# संविधानाच्या संरक्षणार्थ, हे 'पॉडकास्ट' सुरु करायचे कारण...

मी, निरंजनी शेट्टी... मुंबईत राहते आणि मुंबईच्या कोर्टात वकिली व्यवसायही करते. गेली काही दशकं भारताची छबी बदलत चालली आहे. आपण एक धर्मनिरपेक्ष देश म्हणवून घेणाऱ्या राजकारण व धर्मकारणापासून दूर जात, हिंदुधर्माचं वर्चस्व असलेल्या राजकारण व धर्मकारणाकडे वळतो आहोत का?

मी एका पुराणमतवादी असलेल्या समाजातून येते. संविधानाची सत्ता असलेल्या देशात, एक वैयक्तिक स्वतंत्रता-स्वायत्तता असलेल्या वातावरणात, नागरिक म्हणून माझं प्रौढ जीवन गेलं. पण, पुढच्या पिढीला ते नाकारलं जाईल का, याची रास्त भीती वाटते. मीडियाचं उध्वस्त होणे, आपण पाहिलं. भारतीय मीडिया पूर्णपणे कॉर्पोरेट-सत्तेला सलाम ठोकत आहे, तिचा गुलाम बनला आहे. मी एक online जाहिरात पाहिली. त्यात असे दाखवले की, तीन-चार कॉलेजचे तरुण मुलं/मुली हॉटेलमध्ये बसले आहेत आणि त्यातली एक मुलगी, दुसऱ्या मुलीला विचारते, अगं तू तुझ्या बाबांसोबत का आलीस कॉलेजला? तर, ती मुलगी मिश्किलपणे उत्तर देते, नाही, ते माझे बॉयफ्रेंड आहेत !

या जाहिरातीने मी दुखावले...ही येणाऱ्या काळाची 'अलार्म-बेल' आहे. गरीब आफ्रिकन देशात, एक प्रथा आहे 'शुगर डॅडी'ची! 'शुगर डॅडी' म्हणजे, ११-१२ वर्षांच्या शाळेतल्या मुलींना, पैसेवाले प्रौढ पुरुष लैंगिकतेसाठी वापरतात. आजकाल तर त्या देशात, ज्या शाळकरी मुली यात फसतात आणि बालमाता होतात, त्यांना त्यांच्या तान्हुल्या मुलांना शाळेत घेऊन येण्याची व्यवस्थाही करुन दिली जात आहे. काल मी एक व्हायरल झालेला डान्स-रील पाहत होते. प्रभुदेवा आणि एक तरुण बाई नाचत होती... हीथलक कारिब्याड मावा या गाण्यावर तुम्ही लक्ष देऊन बॅकग्राऊंड डान्सर पाहिलेत; तर, अवघ्या ११-१२ वर्षांच्या मुली, अगदी सेक्सी-ड्रेस करुन, लैंगिक हावभाव करुन नाचताना दिसतील. हे कुठेतरी, येणाऱ्या भीषण काळाच्या धोक्याची घंटा तर वाजवत नाही ना?

असो, आता हिंदुधर्माचं वर्चस्व, यावर बोलूया... आरएसएस व भाजपच्या बहुतांश समर्थक व्यक्ती online जगात प्रसिद्ध आहेत. मी कंगना रणौतबद्दल बोलत नाहीये. ती अगदी चांगल्या इंग्लिश अथवा हिंदीमध्ये, हिंदुत्वाच्या बाजूने मते मांडत असते. आजकाल हिंदुत्व या शब्दातून राजकारण ओसंडत असल्याने, हल्ली नवीन शब्द त्यांनी शोधून काढलाय. आता ते 'सनातन-धर्म' असे म्हणतात. गौरव वल्लभ जेव्हा काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊन भाजपत जाताना म्हणाला की, काँग्रेस सनातन-धर्माला मानत नाही, म्हणून मी भाजपमध्ये जातोय! हे 'सनातन-धर्म' म्हणजे नक्की आहे तरी काय? याचा विचार करताना, सनातन-धर्मावर बोलणाऱ्या काही व्यक्ती आहेत, त्यांची नावं इथे देते... वकील साई दीपक, गौरव सावंत, आनंद राघवन, अभिजीत मित्र अय्यर, रणवीर बिअर Biceps पॉडकास्टर, एक थोडाशी सावळ्या रंगाची आणि खूप आकर्षक दिसणारी, खूप छान इंग्लिश बोलणारी एक तरुणी आहे, तिचं नाव आठवत नाही. हे लोक धर्माचं तत्त्वज्ञान वगैरे बोलत नाहीत, ते सरळ-सरळ मुसलमानांनी आपली मंदिरं पाडली आणि हिंदुधर्म उध्वस्त केला, आपण त्याचा बदला घ्यायला हवा... याच्याही पुढे जाऊन, हेदेखील प्रतिपादन करतात की, जगातल्या सगळ्या धर्मांचे मूळ हे, 'सनातन-धर्म' आहे आणि अमूक अमूक ऋषींनी सुरु केले, अशा सर्रास थापा मारतात. बिअर biceps ह्या पॉडकास्टचे शीर्षक इथे देत आहे : The Devine plan behind Sanathan dharm understanding सनातन-धर्म, पूजा आणि हवन : why do sanatanies do it, every hindu must watch it, शिव-कृष्णा-गणेश... असे अजून बरेच आहेत. बिअर biceps पॉडकास्ट चालवणारा एक इंग्लिश बोलणारा तिशीतला तरुण, सनातन-धर्मावर इतकं का बोलतो, याचं आपल्याला आश्चर्य वाटतं. पण, लोक ऐकू इच्छितात असेही नाही. हे ऐकवण्यासाठी पैशाचा पाऊस पडतो, हे लक्षात घ्या. आता, या कामासाठी पैशांचा पाऊस पाडणारा समुदाय हा, भाजप सरकारचा 'लाभार्थी' आहे.

आपण याचा प्रतिकार करण्याची ताकद गमावून बसलो आहोत का? स्वतःला डावे म्हणवून घेणारे आज गोठून गेलेले आहेत का? याला एक अभ्यासपूर्ण प्रतिकार करावा; म्हणून, आम्ही एक प्रयत्न केलेला आहे, त्याला आम्ही संविधानाच्या संरक्षणार्थ असे पॉडकास्टचे नाव दिले आहे आणि पहिली सिरीज ही, भारतीय धर्माच्या इतिहासावर आहे. या सिरीजची आम्ही मांडणी केलेली आहे, त्याचे शीर्षक आहे... साई दीपक, ४०००० पाडलेले मंदिरे शोधून काढणार, संस्कृत भाषा, वामन-बळी, वेद, शैवधर्म, मनुस्मृती, वैष्णव-धर्म इत्यादी. तरी, माझी विनंती आहे की, तुम्हीही या संविधानाच्या संरक्षणार्थ या पॉडकास्टवर तुमचा विचारांचं निवेदन सादर करु शकता. मला आश्चर्याचा धक्का बसला, डावे-पुरोगामी असे म्हणवून घेणाऱ्या लेखकांना, विचारवंतांना, सनातन-धर्माच्या नावाखाली काय प्रचार-प्रसार होतोय याचा अंदाजच नाहीये. भोळ्या-भाबड्या, पापभिरु जनसामान्यांवर त्याचा काय विषारी परिणाम होतो, याचा अंदाज नाही, याचंच मला आश्चर्य वाटतंय !!!

*....निरंजनी शेट्टी*

# 'जुमले'वाल्यांचं सरकार आलं की, 'जुलूम' सहन करण्याशिवाय पर्याय रहात नाही....

अयोध्येत राममंदिर बांधलं यांनी; पण बेरोजगारी, महागाई, नोकरीच्या ठिकाणी 'कंपनी-दहशतवाद' (Corporate-Terrorism), हुकूमशाहीतली 'सरकारी-दहशत', अमानुष आर्थिक-विषमता, नोटबंदी-इलेक्टोरल बॉण्ड्स, 'PMCare' फंडासारखे या शतकातले सगळ्यात मोठे घोटाळे याद्वारे, तुमच्याआमच्या जगण्यातला त्यांनी 'राम' हिरावून घेतलाय...

**ILOच्या म्हणण्यानुसार, भारतात ३०वर्षांखालील ८३% नवतरुण बेकार आहेत... अगदी, IITसारख्या सर्वोच्च तंत्रज्ञान-संस्थांमधून बाहेर पडणारे इंजिनिअर्सही आज मोठ्याप्रमाणावर बेरोजगार म्हणून फिरतायत; कारण, यांच्या गेल्या १०वर्षांच्या सत्ताकाळात 'जॉबलेस-ग्रोथ ते जॉब-लॉस ग्रोथ' अशी, रोजगारनिर्मिती क्षेत्राची प्रचंड घसरण झालीय; म्हणजेच, जेवढी जेवढी म्हणून मोजक्या महाकाय कंपन्यांची प्रगती होत जाते, तेवढे तेवढे अधिकाधिक रोजगार, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने व घृणास्पद व्यवस्थापकीय डावपेचांनी नष्ट होत जातात. गेल्या १०वर्षांत खाण्याचं तेल तिप्पट, गाड्यांचं इंधन-तेल दुप्पट; तर, स्वयंपाकाचा गॅस अडीचपट महागला. महामार्गांची रुंदी वाढली; पण, कामगार-कर्मचारीवर्गाच्या पगाराच्या पाकिटांची जाडी पूर्ण खंगली...अगदी चिप्पाडं झाली त्यांची. उड्डाणपुलांचं-महामार्गाचं काँक्रीटचं जाळं वाढलं; पण, आपल्या व पुढच्या पिढ्यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर उभे केले यांनी. जनतेची क्रयशक्ति (खरेदी-शक्ति) घटली, बचत-क्षमता संपुष्टात येऊन कर्ज घेण्याचं प्रमाण बेसुमार वाढलं...गेल्या दोन वर्षात, घरची लक्ष्मी म्हणजेच, घरातलं सोनं गहाण ठेऊन कर्ज घेण्याचं प्रमाण २००० कोटींवरुन मारुतिसारखं कोटीच्या कोटी उड्डाण घेत २६,००० कोटींपर्यंत पोहोचलं!**

...याचाच अर्थ, तुम्हाला-आम्हाला कायमचं 'गुलाम' बनवू पहातायत ते....

आपली अवस्था, त्या उंदरासारखी त्यांना करुन टाकायचीय, जो एकदा का पिंजऱ्यात कोंडला गेला की, बाहेर पडणं अशक्यच! २०२४ची लोकसभा-निवडणूक, हा तो 'पिंजरा' आहे...सावध राहून मतदान केलंत, तर त्या पिंजऱ्यातून वाचाल; नाहीतर, तुमच्यातला 'माणूस' हळूहळू मरुन जाईल... त्याची जागा एक 'गुलाम' घेईल! तुम्हाला ते उपाशी मारणार नाहीत; तुम्हाला ते निश्चितच तगवतील... १२ तासाला दरमहा १२ हजार पगार देऊन किंवा आज देतात, तसं ८० कोटी लोकांना दरमहा ५ किलो मोफत धान्य देऊन (मात्र, ती किरकोळ मदत, मोदी-शहा सरकारने दिलेली असल्याने, त्याला 'रेवडी' म्हणायला 'बंदी'च); पण, सन्मानाने जगवणार मात्र, नाहीत!

...दावणीला बांधलेल्या, गोठ्यात कोंडलेल्या गुराढोरांसारखं, पुढ्यात टाकलेल्या दर महिन्याच्या ५ किलो चाऱ्यावर गपगुमान गुजराण करायची वेळ आपल्यावर येईल आणि ही भाजपाई-संघीय 'गुजराथी-लॉबी' तुमच्या छाताडावर थयथया नाचेल!

सत्यवचनी राम, स्वप्नात दिलेलं वचन पाळणारा राजा हरिश्चंद्र... ही भारतीय-अध्यात्माची मूर्तिमंत प्रतिकं...तर, हे उठताबसता फेकाफेक करणारे राजरोस 'फेकू' आणि प्रत्येक भारतीयाच्या खात्यात १५ लाख टाकणारे, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या निर्माण करणारे महानिर्लज्ज 'जुमलेबाज'!

...तेव्हा, लक्षात ठेवा, 'जुमले'वाल्यांचं सरकार आलं की, 'जुलूम' सहन करण्याशिवाय पर्याय रहात नाही... त्यांनी लाथा घातल्या तरी, 'काय छान मालिश केलंत', शिव्या घातल्या तर, 'काय छान ओव्या म्हटल्यात' आणि तोंडावर हे जुमलेबाज थुंकले तरी, 'काय छान आंघोळ घातलीत', असं बोलायची नामुष्की आपल्यावर येईल...

तुमच्या त्या 'शिंदे-पवार' गटाचं दुसरं काय चाललंय भाजपवाल्यांपुढे? आणि जे, ईडी/आयटी/सीबीआयच्या धाडी पडायला नकोत...म्हणून अगोदरच ढुंगणाला पाय लावून भाजपाच्या दिशेने पळालेत...त्यांचंही वेगळं काय चाललंय?

जगायचंय तुम्हाला असलं 'गुलामी'चं जीण?? नसेल जगायचं...तर आजचं विचार करुन ठेवा आणि 'इंडिया-आघाडी'ला साध्या नव्हे; प्रचंड बहुमताने विजयी करा; कारण, त्या एतचच्या किमान काही टक्क्यांच्या हेराफेरीला ओलांडून, आपल्याला ही लोकसभा-निवडणूक जिंकण्याखेरीज दुसरातिसरा कुठलाही इतर पर्याय नाही...

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# जयप्रकाश नारायण यांनी विचारले, बेटी, खर्च कसा भागवणार?

इंदिरा गांधी म्हणाल्या, वडिलांच्या पुस्तकातून रॉयल्टी मिळते. त्यातून सर्व होऊन जाईल. इंदिरा गांधी १९७७च्या निवडणुकीत पराभूत झाल्या, तेव्हा नंतरचे सरकार त्यांच्यावर राजकीय सूड घेण्याच्या नादात होते. ही बाब जेपींना कळल्यावर त्यांनाही काळजी वाटू लागली. इंदिरा गांधींचे राजकीय जीवन अद्याप संपलेले नाही, असे विधान त्यांनी केले. सुडाचे राजकारण करू नये, हा जनता पक्षातील प्रमुख नेत्यांना संदेश होता. ते इंदिरा गांधींना त्यांच्या निवासस्थानी भेटायलाही गेले होते. जेपी जेव्हा इंदिरा गांधींना भेटले तेव्हा ते रडले. त्यांनी विचारले की, आता तू पंतप्रधान नसल्यामुळे तुमचा खर्च कसा भागवणार? नेहरूंच्या पुस्तकांच्या रॉयल्टीतून त्या उदरनिर्वाह करु शकतील, असे उत्तर इंदिरा गांधींनी दिले.

त्यांच्यावर कोणताही राजकीय अत्याचार होणार नाही, असे आश्वासन जेपींनी दिले. यासंदर्भात त्यांनी मोरारजी देसाई आणि चरणसिंग यांनाही आवाहन केले.

नुकतीच एक बातमी चर्चेत आली होती की, बिजनौरच्या सरकारी तिजोरीत (कोषागार) ७३ किलो चांदी ठेवण्यात आली आहे. हीच ती चांदी आहे ज्याने इंदिरा गांधींना सामान्य जनतेने तोलले होते. आज त्याची किंमत करोडोंमध्ये असेल पण गांधी घराण्याने त्या चांदीवर कधीही दावा केला नाही. ती आजही बिजनौरच्या कोषागारात आहे.

नेहरूंनी आपली सर्व मालमत्ता दान केली होती, त्यामुळे इंदिरा गांधी पंतप्रधान नसताना त्यांच्याकडे राहण्यासाठी घर नव्हते. जसे आज राहुल गांधी किंवा सोनिया गांधी यांच्याकडे सरकारी निवासस्थानाशिवाय घर नाही.


विलोभनीय अतार्किक कथा सांगणारे नरेंद्र मोदी इंदिरा गांधींकडे कुठे, कोणती आणि किती संपत्ती होती ते सांगतील का?

माजी पंतप्रधानांबद्दल इतके धडधडीत खोटे बोलणे, देशाच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या मोदींना शोभत नाही.

खोट्यारड्यापणाचा मोदी महासागर बनले आहेत.

त्यांना लाज वाटायला हवी.

***...सच्चिदानंद बुगडे***



प्रख्यात अर्थतज्ज्ञ व भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे निरतिशय आदरणीय पती (ज्यांनी, कौटुंबिकहितापेक्षा समाजहिताला-राष्ट्रहिताला प्राधान्य देत भारतीय-अध्यात्माचं मूर्तिमंत प्रतिक असलेल्या रामाचा, बुद्धाचा कित्ताच गिरवलेला आहे) सर्वश्री पराकला प्रभाकर... तुम मुझे चंदा दे दो, मै तुम्हे धंदा दूंगा...नहीं तो, ED/CBI/IT के फाँसी का फंदा दूंगा फेम भाजपा-सरकारविषयी परखडपणे बोलतायत... इलेक्टोरल बॉण्ड घोटाळ्यामुळे 'भाजप (BJP) विरुद्ध भारतीय जनता' (केवळ, भाजप विरुद्ध इंडिया आघाडी नव्हे) असा नवाच संघर्ष देशात उभा राहिलाय. ही तर फक्त, सुरुवात आहे... आगे आगे देखो, होता है क्या...हा 'इलेक्टोरल बॉण्ड घोटाळा', भारतातीलच नव्हे; तर, जगभरातील सर्वात मोठा घोटाळा ठरावा!

मित्रहो, महत्त्वपूर्ण मुद्दा हा की, फक्त राममंदिर बांधून कोणी 'रामभक्त' होत नाही...तर पराकल प्रभाकरांसारखी बेडर-सत्यान्वेषी भूमिका घेऊनच कोणी 'रामभक्त' ठरु शकतो. खरी आध्यात्मिक म्हणून, अशीच व्यक्ति गणली जाऊ शकते...स्वतः निर्मला सीतारमणसह, मोदीशहा-फडणवीस-शिंदे, ही सगळीच बोगस-बनावट हिंदुत्ववादी मंडळी!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



...घंटा डाव्या बाजूला वाजवायची की उजव्या बाजूला, गंधाचा टिळा कपाळावर लावायचा की, आणखी कुठे लावायचा, दीप दोनदा ओवाळायचा की चारदा ओवाळारचा, असल्या निरर्थक प्रश्नांचाच अहोरात्र विचार करण्याची ज्यांच्या डोक्याला सवय जडलेली आहे, त्या लोकांना 'करंटे' हे एकच नाव शोभून दिसते. आपले भले व्हावे, अशी तुमची मनोमन इच्छा असेल; तर, तुमचे हे सारे विधी, सारे उपचार झुगारून द्या व जिवंत ईश्वराची पूजा सुरू करा. मनुष्याचे रूप धारण करणाऱ्या प्रत्येक प्राण्याची, त्या मानव-ईश्वराची, ईश्वराच्या विश्वात्मक; तसेच, व्यक्तिगत रुपांची पूजा करा. हे अवघे जग म्हणजे ईश्वराचे विश्वात्मक रूप होय! त्याची पूजा करायची म्हणजे, त्याची सेवा करायची.

***...स्वामी विवेकानंद*** (१८९४ साली गुरुबंधूना लिहीलेल्या पत्रातील मजकूर)

# जनाची नाहीतर मनाची तरी, ठेवा हो....

एखाद्या देशाचा पंतप्रधान, किती उठसूठ खोटं बोलणारा व देशाची सतत किती दिशाभूल करणारा असावा, याला काही मर्यादा...???

तामीळनाडू भेटीत, ज्या 'कचाथीवू' (Katchatheevu) बेटावरुन मनमोहनसिंग सरकारवर पं. नरेंद्र मोदींनी टीकेचं एकच मोहोळ उठवलं (अर्थातच, लोकसभा-निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुद्दामहूनच), ते 'कचाथीवू' बेट, हे श्रीलंकेतील एक निर्जन बेट.

१९२१ पासून या निर्जन बेटावर ब्रिटीश-सिलोनचे (आताची श्रीलंका) नियंत्रण होते. भारत सरकारचं त्यावर कधिही कुठलंही नियंत्रण नसतानाही, हे अगदी छोटेखानी बेट (क्षेत्रफळ अवघे २८५ एकर) भारत आणि श्रीलंका यांच्यात १९७४ पर्यंत विवादीत राहिले व त्यानंतर, भारताने या निर्जन-बेटावरील श्रीलंकेचे सार्वभौमत्व मान्य केले!

आता मजा बघा...याच नरेंद्र मोदी सरकारने वर्ष-१९४७पासून विवादीत असलेला भारत-बांगलादेश सीमातंटा संपुष्टात आणण्यासाठी, ६ जून-२०१५ रोजी जमीन सरहद्द करार (Land Border greement...LB) करुन तब्बल १०,००० एकर सुपीक जमीन (ज्यावर फार मोठ्याप्रमाणावर लोकं रहात होती; म्हणजे, 'कचाथीवू' बेटासारखी, ती जमीन 'निर्जन' बिलकूल नव्हती) अधिकची बांगला देशाला 'दान' दिली (आपण बांगला देशाला १७,१७०.६३ एकर जमीन दिली आणि त्याबदल्यात, बांगला देशाने आपल्याला फक्त ७,११०.०२ एकर एवढीच जमीन, या डइ करारान्वये दिली)...पण, नरेंद्र मोदी त्याविषयी ब्र काढत नाहीत!

...ही अश्लाघ्य स्वरुपाची बेईमानी तर आहेच; पण, अशा वाईट-घृणास्पद रितीने काँग्रेस-सरकारला नाहक बदनाम करण्याची मोहिम सुरुच ठेवणे, ही अतिशय शरमेची बाब असून, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिष्ठा खाली आणणारी आहे.

लक्षात घ्या, याअगोदरच, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल अटक प्रकरणावरुन व लोकसभा-निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसची बँक-खाती गोठवणे वगैरे बाबींवरुन जर्मनी, अमेरिका, संयुक्त-राष्ट्रसंघ (UNI) आणि म्नेस्टी इंटरनॅशनल यांनी भारतावर कडक टीका केलेली आहे. तशीच टीका, महिला-पहेलवानांवरील दिल्लीत झालेल्या अत्याचारांवरुन आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीनेही केली होती.

शिवाय भारत, अमेरिका, जपान व ऑस्ट्रेलिया या देशांनी मिळून बनलेल्या 'सामरिक सुरक्षा संवादा'तून (QUD OR Quadrilateral Security Dialogue) भारताची हकालपट्टी करण्यात आल्याचं (सरकारी दुजोरा न मिळालेलं) वृत्त आहे. मात्र जशी गलवान खोऱ्यातील भारताची जवळपास ४००० चौ.कि.मी. जमीन चीनने घशात घातल्याची बातमी, या बदमाष 'गोदी-मिडीया'ने दाबून टाकली (त्याविरोधातच, लडाखचे ख्यातनाम सामाजिक-कार्यकर्ते 'सोनम वांगचुक' यांनी नुकतंच २१ दिवसांचं उपोषण केलं होतं व ते आता या घटनेच्या निषेधार्थ, लडाख ते चीनने बळकावलेल्या गलवान-खोर्यापर्यंत पायी चालत जाणार आहेत)...तशाच, या महत्त्वपूर्ण बातम्या, 'गोदी-मिडीया'तून नेहमीप्रमाणेच गायब आहेत!

आपल्याच दळभद्री-कर्मदरिद्री वृत्तीमुळे, आपणच आपल्यावर गेली सलग दहा वर्षे लादून घेतलेलं, हे फार मोठ्या दुर्दैवाचं ओझं...निदान, २०२४च्या लोकसभा-निवडणुकीच्या मतपेटीतून तरी, आपण आपल्या मनगुटीवरुन उतरवून, दूर फेकून देतो की, नाही...ते, येणारा काळच ठरवेल, धन्यवाद!

***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)





*धारगाव (ता. मुरबाड, जि. ठाणे) येथील हनुमान-मंदिराच्या जीर्णोद्धार व नूतनीकरणाप्रित्यर्थ, समस्त गावकऱ्यांतर्फे 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांचा हृद्य सत्कार करण्यात आला...त्याची क्षणचित्रे!*


मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित
'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'
या कामगार संघटनेत सामील व्हा !!!



राजन राजे
(अध्यक्ष)



महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७



कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)